


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

* वर्ष १ * अंक ७८ * * नाशिक * रविवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

# स्वदेशीतून समृद्ध भारत

## स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांचा निर्धार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :**



अमेरिकेने लादलेल्या वाढीत आयात शुल्काविरोधात देश समर्थपणे उभा राहील असा निर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्यक्त केला. स्वदेशीच्या मंत्रातून देश प्रगतिपथावर राहील, त्याला कोणीही रोखू शकणार नाही असे मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्लयावरून केलेल्या भाषणात अधोरेखित केले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाचा उल्लेख पंतप्रधानांनी टाळला असला तरी, जगभरात आर्थिक स्वार्थ वाढू लागल्याचे नमूद केले. त्यातून उद्भवणाऱ्या संकटात रडण्याचे कारण नाही. तर दाम कम, दम जादा हा मंत्र स्वीकारून भारतीय उत्पादकांनी दर्जेदार उत्पादनांनी जगाच्या बाजारपेठेत लौकिक मिळवावा, अशी अपेक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली. तसे झाले तर कोणाचाही आर्थिक स्वार्थ भारताला त्यांच्या जाळ्यात अडकवू शकणार नाही, असे आवाहन मोदींनी देशातील लाखो लघुउद्योजकांना केले.

अमेरिकेच्या आयातकराच्या धोरणामुळे भारताला आर्थिक संकटात आणण्याचे प्रयत्न केले जात असल्याचा मुद्दाही मोदींनी भाषणामध्ये उपस्थित केला. शेतकरीविरोधी धोरण भारत सहन करणार नाही. देशातील शेतकरी, पशुपालक, मच्छीमार यांचे कधीही नुकसान होऊ देणार नाही. त्यांच्या हितासाठी भिंत बनून उभा राहीन, अशी ग्वाही मोदींनी दिली.

ऑपरेशन सिंदूरचे यश, देशांतर्गत सुरक्षेचे महत्त्व, विकसित भारताचे लक्ष्य या मुद्द्यांचा ऊहापोह त्यांनी १०३ मिनिटांच्या भाषणात केला.

सीमाभागांत घुसखोरी करून डेमोग्राफिक बदल (स्थलांतरातून लोकसंख्येच्या रचनेत बदल) केले जात आहेत. या घुसखोरीतून देशातील युवकांचे रोजगार हडपले जात आहेत. डेमोग्राफिक बदल करणारी ही घुसखोरी देशासमोरील मोठे संकट असून त्यातून सामाजिक तणाव निर्माण होतो. ही घुसखोरी सहन केली जाणार नाही. केंद्र सरकारने घुसखोरीला आळा घालण्यासाठी उच्चस्तरीय डेमोग्राफी मिशन सुरू केले असून विशिष्ट वेळेत उद्दिष्ट साध्य केले जाईल, असे मोदी म्हणाले.

# मानखुर्दमध्ये दहीहंडीला गालबोट

## पहिल्या मजल्यावरून पडून गोविंदाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**

राज्यभरात मोठ्या उत्साहात सुरू असलेल्या दहीहंडी उत्सवाला मुंबईत गालबोट लागल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मानखुर्द येथे दहीहंडीचा दोर बांधत असताना एका ३२ वर्षीय गोविंदाचा पडून मृत्यू झाला. जगमोहन चौधरी असे या गोविंदाचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. दुसरीकडे मुंबईतील विविध भागांतून गोविंदा जखमी झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

**मुंबईत विविध ठिकाणी ३० गोविंदा जखमी**



मानखुर्दच्या महाराष्ट्र नगरमध्ये दहीहंडी उत्सवादरम्यान 'बाल गोविंदा पथक' दहीहंडी फोडण्यासाठी तयारी करत होते. त्याचवेळी जगमोहन चौधरी (वय ३२) हा गोविंदा गल्लीतल्या बालगोपाळांसाठी पहिल्या मजल्यावरून दहीहंडी बांधता होता. त्यावेळी अचानक तोल जाऊन खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने ऑटोमधून जवळच्या शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मुंबईत दुपारी तीनपर्यंत विविध ठिकाणी झालेल्या दहीहंडी कार्यक्रमांत थरावरून पडल्याने ३० गोविंदा जखमी झालेत ३० गोविंदे जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. यातील १५ जणांना उपचार करून घरी पाठवण्यात आले, तर १५ जणांवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबई शहरात १८ जण जखमी झालेत. त्यापैकी १२ जणांवर उपचार सुरू आहेत. ६ जणांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आले आहे. पूर्व उपनगरात ६ गोविंदा जखमी झालेत. त्यातील तिघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर तिघांना घरी सोडण्यात आले आहे. पश्चिम उपनगरातही ६ जण जखमी झालेत. एकावर उपचार सुरू आहेत.

# पावसामुळे दरड कोसळली

## बाप-लेकीचा मृत्यू, आई-मुलगा गंभीर जखमी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**

विक्रोळी पार्क साईट परिसरात शनिवारी पहाटे दरड कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. मुसळधार पावसामुळे ही दुर्घटना घडली असून, मृतांमध्ये बाप-लेकीचा समावेश आहे.

काल रात्रीपासून मुंबईत जोरदार पावसाला सुरुवात झाली असून, पूर्व उपनगरातील डोंगर उतारावरील झोपडपट्ट्यांमध्ये पावसाचा मोठा फटका बसतो आहे. विक्रोळीतील पार्क साईट परिसरात आज पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास मिश्रा कुटुंबाच्या झोपडीवर दरड कोसळली. अग्निशमन दल व पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने घटनास्थळी दाखल होत बचावकार्य सुरू केले.

दरडीत अडकलेल्या सुरेश मिश्रा (५०) आणि त्यांची मुलगी शालू मिश्रा (१९) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर त्यांच्या पत्नी आरती मिश्रा (४५) आणि मुलगा ऋतुराज मिश्रा (२०) हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुंबई महापालिकेने यंदा पावसाळ्यापूर्वी काही भाग धोकादायक म्हणून घोषित केले होते. मिश्रा कुटुंबाला घर खाली करण्याचे नोटीस देण्यात आली होती. मात्र त्यांनी घर सोडले नव्हते.

# महापालिका निवडणुकांची दहीहंडी महायुतीच फोडणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**

राज्यात मागील अडीच वर्षांत मी मुख्यमंत्री म्हणून केलेले काम जनतेसमोर आहे. त्याच बळावर विधानसभेत महायुतीला ऐतिहासिक यश मिळाले. आम्ही २३२ थर लावून विधानसभेची हंडी फोडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महायुती दहीहंडी फोडणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ते आज ठाणे येथे माध्यमांशी बोलत होते.



**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास**

मुंबईसह राज्यात आज दहिहंडीचा उत्साह आहे. ठाणे शहरात टेंभी नाका मित्र मंडळाच्या वतीने देखील दहीहंडी उत्सावाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुपारी हजेरी लावली. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना उपरोक्त विश्वास व्यक्त केला.

राज्यात मागील अडीच वर्षांत मुख्यमंत्री म्हणून मी जे काम केले, ते राज्याला माहीत आहे. त्यामुळे विधानसभेला महायुतीला ऐतिहासिक विजय मिळाला. आम्ही २३२ थर लावून विधानसभेची हंडी फोडली. आता देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली दुसरी इनिंग सुरू झालेली आहे. कामही त्याच वेगाने सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची हंडी देखील महायुतीच फोडेल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. आमचा अजेंडा विकासाचा आहे. आम्ही विकासाचे थर लावले. पाकिस्तानच्या गर्वाची हंडी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैन्याने फोडली, याचा आम्हाला अभिमान आहे.

# दुभाजक तोडून बस ट्रकला धडकली

## ४ जण ठार

■ **वृत्तसंस्था, शिवपुरी, दि. १६ :**

शनिवारी सकाळी शिवपुरी येथे ट्रक आणि प्रवासी बसची समोरासमोर धडक झाली. या अपघातात एका गायकासह ४ जणांचा मृत्यू झाला तर ७ जण गंभीर जखमी झाले आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २७ वर सकाळी ५.३० वाजता हा अपघात झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी संध्याकाळी काशी विश्वनाथ येथे आयोजित शिवकथेच्या कार्यक्रमात सादरीकरण केल्यानंतर २० संगीतकारांचा एक गट परतत होता. गटातील सर्व सदस्य गुजरातमधील मेहसाणा आणि सुरेंद्रनगर येथील रहिवासी आहेत. शनिवारी सकाळी त्यांचा ट्रॅव्हलर सुरवाया येथून जात होती. यादरम्यान, अनियंत्रित झाली, दुभाजकावर चढली आणि दुसऱ्या लेनमध्ये गेली आणि एका ट्रकला धडकली.

पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे. सुरुवातीला असे मानले जात आहे की चालकाला झोप लागल्याने हा अपघात झाला. मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी पाठवण्यात आले आहेत आणि जखमींवर उपचार सुरू आहेत.

सुर्वया पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना बाहेर काढून जिल्हा रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले. या अपघातात गायक हार्दिक दवे (४०) यांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, राजा ठाकूर (२८), अंकित ठाकूर (२२) आणि राजपाल सोलंकी (६०) यांचाही रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

रावल मोहित, आशिष व्यास, मोहालक, नरेंद्र नायक, चेतन कुमार, ऋषिकेश, विपुल, अरविंद, अर्जुन, हर्षद गोस्वामी आणि ट्रॅव्हलरचा चालक जखमी झाले आहेत. त्यापैकी ७ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

# मुंबई मनपा लुटणाऱ्यांची हंडी फोडणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मुंबई महापालिकेला लुटणाऱ्यांची हंडी फोडणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना इशारा दिला आहे. निवडणुकीनंतर विजयाची हंडी फोडणार असल्याचा विश्वास देखील फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



**देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांना इशारा**

भाजप आमदार राम कदम यांच्या वतीने घाटकोपरमध्ये आयोजित दहीहंडी महोत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते. या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी सर्वांना दहीहंडी महोत्सवाच्या शुभेच्छा देखील दिल्या.

या वेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर विजयाची हंडी तर आम्ही फोडणारच आहोत. मात्र ज्यांनी महानगरपालिका लुटली, त्यांच्या पापाची हंडी देखील आम्ही फोडणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही जी हंडी लावू त्यातले लोणी हे सर्व सामान्यांना मिळेल, ते कोणाच्या घरात जाणार नाही, हा प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैनिकांनी पाकिस्तानच्या पापाची हंडी फोडली होती. आता मुंबईमध्ये राम कदम यांच्या माध्यमातून ऑपरेशन सिंदूरची आठवण म्हणून या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या विषयी फडणवीस म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पाकिस्तानच्या पापाच्या हंडी भारतीय सैनिकांनी फोडली होती. त्या सैनिकांना या ठिकाणी सलाम केला जात आहे. याबद्दल राम कदम यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे.

# आजपासून महाआघाडीची मतदान अधिकार यात्रा

■ **वृत्तसंस्था, सासाराम, दि. १६ :**

महाआघाडीची मतदान अधिकार यात्रा १७ ऑगस्ट रोजी सासाराम येथून सुरू होणार आहे, परंतु जिल्हा प्रशासनाने सभेचे ठिकाण आणि राहुल गांधी यांच्या हेलिकॉप्टर लँडिंगला परवानगी दिलेली नाही. यावर राजद खासदार सुधाकर सिंह यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले आहेत की, 'हेलिकॉप्टरही उतरेल आणि जर सभेच्या ठिकाणी नाही तर राहुल गांधी आणि तेजस्वी यादव नक्कीच रोड मार्च करतील.' प्रशासनाच्या इच्छेमुळे महाआघाडीच्या कार्यक्रमावर कोणताही परिणाम होणार नाही.

# आग लागल्याने ४ जणांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था,जालोर, दि. १६ :**

बंगळुरूमध्ये जालोर येथील एका व्यावसायिकाचे कुटुंब जिवंत जळाले. चार मजली इमारतीच्या तळमजल्यावरील गोदामात आग लागली. काही वेळातच आग सर्व मजल्यांवर पसरली.

या अपघातात राजस्थानी व्यापारी मदन सिंह राजपुरोहित (मोदरान), त्यांची पत्नी आणि दोन मुले यांचा मृत्यू झाला. स्थानिक प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील नागरपेठ परिसरातील स्टील मार्केटमधील एका इमारतीत आग शुक्रवार-शनिवारी रात्री इमारतीला आग लागली. लोक इमारतीत अडकले. जालोरचे कुटुंब चौथ्या मजल्यावर राहत होते.

शुक्रवार-शनिवारी रात्री इमारतीला आग लागली. लोक इमारतीत अडकले. जालोरचे कुटुंब चौथ्या मजल्यावर राहत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, मदन सिंग हे त्यांच्या कुटुंबासह इमारतीच्या चौथ्या मजल्यावर राहत होते. इमारतीच्या खाली त्यांचे स्टीलच्या भांड्यांचे गोदाम होते. मिळालेल्या माहितीनुसार, आग त्यांच्या गोदामात लागली. त्यानंतर ती इमारतीच्या इतर भागात पसरली. मदन यांचा गोदामात मृत्यू झाला. तर त्यांची पत्नी आणि दोन निष्पाप मुले फ्लॅटमध्येच मृत्युमुखी पडली. या इमारतीत काहींनी आगीतून इमारतीतून उडी मारून आपले प्राण वाचवले. शनिवारी सकाळपर्यंत अग्निशमन दल आणि एसडीआरएफ पथक आग विझवण्याचा प्रयत्न करत होते.

# दर्ग्याची भिंत कोसळून ६ ठार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :**

दिल्लीच्या निजामुद्दीन परिसरातील मुघल बादशाह हुमायूनच्या कबरीजवळ एका दर्ग्याची भिंत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत चार जण जखमी झाले आहेत. शुक्रवारी दुपारी ३.५५ वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली.



जखमींना एम्स रुग्णालय आणि एलएनजेपी रुग्णालयात दाखल करण्यात आले, असे सहपोलीस आयुक्त संजय कुमार जैन यांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवा (डीएफएस), दिल्ली पोलीस, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि दिल्ली आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (डीडीएमए) घटनास्थळी दाखल झाले. शुक्रवारच्या प्रार्थनेसाठी अनेक भाविक दर्ग्यात जमले होते. मुसळधार पावसामुळे ते दर्ग्यातच थांबले होते. एका भिंतीवर भार आल्याने ती कोसळली.




# विकसित भारताच्या जडणघडणीत महाराष्ट्र अग्रेसर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश सातत्याने प्रगती करत आहे. केवळ एका दशकामध्ये भारताने जगातल्या अकराव्या अर्थव्यवस्थेपासून चौथ्या मोठ्या अर्थव्यवस्थेपर्यंत मोठी मजल मारली आहे. आज भारताच्या संपूर्ण विकास व्यवस्थेमध्ये महाराष्ट्र राज्य अतिशय वेगाने पुढे जात आहे. विकसित भारताच्या स्वप्नामध्ये विकसित महाराष्ट्र विशेष योगदान देत आहे. देशाची ही विकासगाथा यापुढे थांबणार नाही. पंतप्रधानांनी आत्मनिर्भर भारताचा नारा दिला आहे, हा नारा अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताला आत्मनिर्भर करण्याकरता आपल्या सर्वांना मिळून प्रयत्न करावे लागतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण

स्वातंत्र्य दिनानिमित्त मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. या समारंभाप्रसंगी संबोधित करताना ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरच्या निमित्ताने भारतीय सेनेने भारताची शक्ती काय आहे, हे संपूर्ण जगाला दाखवून दिले आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताच्या सेनेने अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सर्व आतंकवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. त्यातून भारतावरील होणारे हल्ले परतवून लावले. यामुळे जगाला देखील नवीन भारत काय आहे, हे या ऑपरेशन सिंदूरमुळे समजले आहे. म्हणून ऑपरेशन सिंदूरमध्ये ज्या-ज्या सेनेच्या अधिकाऱ्यांनी आणि सैनिकांनी सहभाग घेतला त्यांचंही अभिनंदन करतो, त्यांचे आभार मानतो असे ते म्हणाले.

भारतामध्ये थेट परदेशी गुंतवणूक येते, त्यापैकी चाळीस टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रामध्ये आली आहे. या गुंतवणुकीतून मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती राज्यामध्ये होत आहे. वस्तुनिर्माण, आयात-निर्यात, स्टार्टअप क्षेत्रात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. ही एक मोठी विकासाची घोडदौड सुरू आहे. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांकरता मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मिळाली पाहिजे, याकरता मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत जगातला सगळ्यात मोठा डिस्ट्रीब्यूटेड सोलरचा प्रकल्प महाराष्ट्रामध्ये सुरू आहे. हा प्रकल्प २०२६ च्या डिसेंबरमध्ये पूर्ण झाल्यानंतर निश्चितपणे शेतकऱ्यांना १२ तास दिवसाची वीज मिळेल. त्यावेळी शंभर टक्के हरित वीज देणारा महाराष्ट्र हे पहिलं राज्य होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सिंचनाच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात काम चालू आहे. विशेषतः नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून वैनगंगा, नळगंगा योजना असेल, किंवा समुद्रात वाहून जाणारे पाणी हे गोदावरीच्या खोऱ्यामध्ये आणून उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्याला दुष्काळमुक्त करणे, विविध नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून तापीच्या खोऱ्यामध्ये पाणी आणणे. यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतीला, उद्योगाला, पिण्याचे पाणी देण्याकरता मुबलक अशा प्रकारचे पाणी साठे तयार करणारे महाराष्ट्र एक महत्त्वाचे राज्य होणार आहे.

## महत्त्वाचे

### निफाड महाविद्यालयात सभापती क्षीरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**निफाड ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि



विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या शुभहस्ते ध्वजाचे पूजन आणि ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. उत्तम डेर्ले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, माधवराव गीते, जानकीराम धारराव, अशोक कुंदे, रमेश जाधव, अशोक वडघुले, यशवंत वडघुले, छोटू पानगव्हाणे, भाऊसाहेब कापसे, सुधाकर कापसे, रामनाथ धारराव, बाळासाहेब सानप, सुनील वडघुले, तुषार खालकर, योगेश कुंदे, संदीप गाजरे आदी उपस्थित होते. एनसीसी केडेटने शिस्तबध्द असे संचालन करत मान्यवरांना मानवंदना दिली. यावेळी महाराष्ट्र शासन पोलिस अधीक्षक कार्यालय नाशिक यांनी आदेशित केल्याप्रमाणे ध्वजारोहना नंतर 'अंमली पदार्थ विरोधी शपथ वाचन' केले गेले. ही शपथ सर्वांनी सामूहिक स्वरूपात घेतली. महाविद्यालयाचे माजी खेळाडू मयूर वनसे, ऋतिक परदेशी, आदित्य जाधव, सुमित भोई, सागर आहिरे, प्रवीण शेळके यासर्वांची महसूल सहाय्यक पदी मुंबई मंत्रालय येथे नियुक्ती झाली त्याबद्दल या सर्वांचा यथोचित सन्मान क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. त्याबरोबरच एनसीसी बेस्ट केडेड म्हणून आदित्य मत्सागर, वैष्णवी लगडे, ऋतुजा शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य योगेश कुंदे यांनी कै. सुधाकर कुंदे आणि कै. विमलाबाई कुंदे यांच्या स्मरणार्थ अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या एकूण २४ गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करून उपस्थितांना दातृत्वाची प्रेरणा दिली

### रोहिले बुद्रुक येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा

**नांदगाव ।** तालुक्यातील रोहिले बुद्रुक येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आणि माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज तर्फे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील तिरंगा ध्वजाचे ध्वज पूजन रोहिले बुद्रुक ग्रामपंचायत उपसरपंच सुनंदा बागुल व शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्ष प्राजक्ता गायखे यांच्या हस्ते करण्यात आले. सरपंच ठकुबाई देविदास पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज रोहिले बुद्रुक येथील तिरंगा ध्वजाचे ध्वज पूजन



सरपंच ठकुबाई पवार उपसरपंच सुनंदा बागुल यांच्या हस्ते करण्यात आले. तर तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका जे. एस. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील आणि माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांची प्रथम संपूर्ण गावात प्रभात फेरी काढण्यात आली. येथे असलेल्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली व राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

### स्वातंत्र्यदिनी पाड्यावरील विद्यार्थ्यांना टी-शर्ट, खाऊचे वाटप

**नाशिक ।** ज्येष्ठ नागरिकांसाठी हक्काचे व्यासपीठ असलेल्या लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून नुकताच



संस्थेतर्फे त्र्यंबकेश्वर तालुक्यातील खरोली या पाड्यावरील लहान मुलांना खाऊ आणि टीशर्टचे वाटप केले. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. खरोली (ता.त्र्यंबकेश्वर) या पाड्यावरील दौऱ्यात लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचाचे पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य, संस्था सदस्य, देणगीदार मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी उपस्थितांनी पाड्यावरील जिल्हा परीषदेच्या शाळेला भेट दिली. व इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना टी-शर्ट तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे शिक्षक, पाड्यावरील मान्यवर व्यक्त उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातुन नाच गाणे व नाटीका सादर केली. लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांजून सामाजिक बांधिलकी जपली जात असल्याचा संदेश यावेळी दिला. भविष्यातही अशाच उपक्रमांतून समाजाप्रतीचे कर्तव्य संस्थेमार्फत पार पाडले जाईल, अशी ग्वाही पदाधिकाऱ्यांनी दिली.

# शहर-जिल्ह्यात सर्वत्र ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात

## भारतीय राष्ट्रध्वजाला आबालवृद्धांकडून मानवंदना...

**नाशिक ।** जहाँ डाल डाल पर सोने की चिडिया करती है बसेरा। वह भारत देश है मेरा। अशा एक ना अनेक देशभक्तीपर गीतांची कवने गात शुक्रवारी (दि. १५ ऑगस्ट) शहर-जिल्ह्यावासीयांनी भारतीय ध्वजाला मानवंदना देत अपूर्व उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा केला. ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा करताना साऱ्याच नागरिकांचा उर स्वाभिमानाने दाटून आला होता. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, समस्त शिक्षक वृंद, शासकीय कर्मचारी, सहकारी कर्मचारी, खासगी कर्मचारी, पोलीस दल, संस्था, मंडळे, आस्थापना, राजकीय पक्ष-संघटना, शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, बँका यासह सर्वच घटकांनी भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा स्वातंत्र्यदिन अति उत्साहात, विविध कार्यक्रम सादर करत साजरा केला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू असल्याने गेल्या तीन चार दिवसांपासून शहर-जिल्ह्यात भरगच्च कार्यक्रम साजरे झाले. नाशिक विभागीय आयुक कार्यालयात मुख्य शासकीय ध्वजवंदन सोहळा पार पडला, जिल्हधिकारी कार्यालय, महापालिका, जिल्हा परिषद, पोलीस मुख्यालय, पोलीस आयुक्तालय यासह सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ध्वजवंदन सोहळा संपन्न झाला. स्वातंत्र्यदियानिमित्ताने सर्वच कार्यालयांना, गंगापूर धरणाला तिरंगी विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

स्वातंत्र्यदिननिमित्ताने शहर-जिल्ह्यात भरगच्च कार्यक्रम संपन्न झाले. दिवसभर देशभक्तीपर गीतांची कवने कानांना तृप्त करीत होती. यानिमित्ताने शहर-जिल्ह्यात अनेक ठिकाणी प्रभात फेरी, रॅली, मिरवणूक काढण्यात आल्या. सर्वत्र तिरंगी ध्वज फडकत होते. विविधांगी गोष्टी, कार्यक्रम यामुळे अवघे वातावरण तिरंगीमय झाले होते.

**नासाका कार्यस्थळावर ध्वजारोहण**

**नाशिकरोड ।** पळसे येथील नाशिक सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील



माध्यमिक विद्यालय आणि आदर्श प्राथमिक विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात माजी खा.हेमंत गोडसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नासाकाचे संचालक शेहजादबाबा पटेल, नाशिक सर्व सेवाभावी ट्रस्टचे मानद व्यवस्थापक सुधाकर गोडसे, भारतीय सैन्य दलातील जवान चंद्रभान बोराडे, भारतीय थल सेनेतील जवान रोहित गायधनी, श्रीमंत श्री नर्सरीचे संचालक हिरामण आडके, पालक शिक्षक संघाचे माजी उपाध्यक्ष भास्कर सानप, युवा उद्योजक ज्ञानेश्वर सानप, ग्रामपंचायत सदस्या शोभा गायधनी, सामाजिक कार्यकर्ते विलास गायधनी, नवनाथ मुंजे, मनोहर सानप, कृष्णा सोनवणे, वैशाली गायधनी, ललिता आडके, संदीप आडके, रवींद्र विंचू यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.

नासाकाचे अवसायक प्रदीप आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या समारंभात सामुदायिक कवायतीसह प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देण्यात आली. राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीताबरोबर 'बलसागर भारत होवो...' हे राष्ट्रीय गीत विद्यार्थ्यांनी तालासुरात सादर करून वातावरण मंत्रमुग्ध केले. सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रा.बाळकृष्ण अंजनगावकर, श्रीमंत श्री नर्सरीचे संचालक हिरामण आडके, नाशिकरोड-देवळाली शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे सरचिटणीस गोकुळ नागरे, वडगाव पिंगळा गावचे माजी पोलीस पाटील कचरू पा.सानप, शिक्षिका एस.एल.वाणी, शिक्षक कैलास लहांगे या मान्यवरांच्या वतीने मार्च-२०२५च्या दहावी शालांत परीक्षेतील गुणवंतांचा रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दयाराम गायधनी यांनी फुटबॉल तर सैन्यदलातील जवान चंद्रभान बोराडे, योगेश आडके, मुरलीधर सानप, कचरू पा. सानप यांनी चॉकलेटची भेट देण्यात आली. जवान चंद्रभान बोराडे आणि सामाजिक कार्यकर्ते विलास गायधनी यांनी विद्यार्थ्यांना शुभसंदेश दिला. विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक अरुण पगार, चंद्रकांत खाणकरी यांच्यासह दोन्ही विद्यालयांच्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.

**स्वच्छतेचा संदेश देत काजल पंजाबी यांच्या हस्ते भगूरला ध्वजवंदन**

**नाशिक ।** सालाबाद प्रमाणे या वर्षीही साई किरण स्टील सेंटर लहवित रोड भगूर येथे संचालक व कारागिर कामगार बांधवांच्या



वतीने सामाजिक उपक्रम राबवत भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. काजल अशोक पंजाबी उपस्थित होत्या. त्यांच्याच हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास दयावान बाबा, अशोक हुकूमचंद पंजाबी, आसिफ शेख, कैलास पाटील, रामा पाटील, मधुकर जावळे, राजू डोंगरे, शरद वाघ, नितीन खंदारे, अंकुश कुंभरगावे बहादूर आदि मान्यवर उपस्थित होते. स्वातंत्र्य दिन विशेष उपक्रम म्हणून आपलं गाव, शहर, नदी स्वच्छ ठेवा असा संदेश देत रस्त्यावर थुंकणार नाही, ध्वनी वायू प्रदुषण करणार नाही, कायदा सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी पोलीसांना हातभार लावत आपणही शहरासाठी योगदान देऊ असा निर्धार सौ. काजोल पंजाबी यांनी केला. पाणी विज वाया जाऊ देणार नाही आपला परीसर स्वच्छ ठेवणार अशी सामुदायिक शपथ यावेळी देण्यात आली

गोमाता सेवक वृक्षमित्र अशोक पंजाबी उर्फ दयावान बाबा गेल्या ४० वर्षांपासून पंजाबी परीवाराच्या वतीने कामगारांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला जातो. स्वातंत्र्य दिन पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. सोमवारी शिवभक्तांसाठी एक हजार भाविकांसाठी महा भंडारा प्रसाद आयोजित करण्यात आला असून गोमाता सेवा करण्याचा निर्धार करत गो शाळेतील दहा गाई दत्तक घेण्यात आल्या. १५ ऑगस्टचे औचित्य साधून पुणे महामार्ग, नासर्डी पुल, ब्लाईंड विद्यार्थी वसतीगृहात आठवड्यातून दोनदा भोजन देण्याच्या उपक्रमाचा यावेळी शुभारंभ करण्यात आला.



**सावानात स्वातंत्र्य दिन साजरा**

**नाशिक ।** सार्वजनिक वाचनालय नाशिक येथे स्वातंत्र्य दिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण वाचनालयाचे कार्याध्यक्ष संजय करंजकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.दिलीप फडके,उपाध्यक्ष प्रा. सुनील कुटे,डॉ.विक्रांत जाधव, प्रमुख सचिव सुरेश गायधनी यांनी सर्वांना शूभेच्छा दिल्या. यावेळी सहाय्यक सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, ग्रंथ सचिव देवदत्त जोशी, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, सदस्य डॉ.धर्माजी बोडके, सौ.प्रेरणा बेळे आदि पदाधिकारी उपस्थित होते. कार्याध्यक्ष संजय करंजकर यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाचा संदेश दिला. याप्रसंगी सुभाष पाटील, नंदू वराडे, रोटरीचे अध्यक्ष कैलास सोनवणे, कैलास ब्राह्मणकर, ललित पगार, इनरव्हील अध्यक्ष अनिता सोनवणे, आशा पगार , पार्थ ठोंबरे, सर्व पदाधिकारी, कर्मचारी आणि नाशिक शहरातील प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.दिलीप अहिरे यांनी सूत्रसंचालन केले.

**कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात**

**विंचूर ।** येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात



साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, विद्यालयाच्या विविध समित्यांचे सदस्य, तसेच पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. त्यानंतर विद्यालयात भारतीय ध्वजाचे ध्वजारोहण स्थानिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष जगदिश जेऊघाले यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयातील स्काऊट गाईडचे ध्वजारोहण उपाध्यक्ष कैलास सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील गीतमंचाने देशभक्तीपर गीते गायन केली. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यालयातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सामुदायिक कवायत संचलन केले तसेच स्काऊट आणि गाईडच्या पथकाने उत्कृष्ट असे संचालन केले व त्यानंतर प्रा. भाऊसाहेब महाडदेव यांनी उपस्थित सर्वांना अमली पदार्थ विरोधी शपथ दिली त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली.

हा संपूर्ण कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर राजेंद्र चांदे यांनी केले तर आभार विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे यांनी मानले.सदर कार्यक्रम प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉक्टर सुजित गुंजाळ, पंढरीनाथ दरेकर,अनिल दरेकर, उपसरपंच कुमार चव्हाण, साळुंके पोलीस उपनिरीक्षक लासलगाव, शंकरराव दरेकर, राजेंद्र मोरे, संजय शेवाळे,के.के अण्णा, सोमनाथ निकम, राजाभाऊ गोरे,पी. के जेऊघाले, अशोक दरेकर, निखिल राऊत, निकाळे,अण्णा कुमावत, विनायक जेऊघाले, सुरेश आहेर, पत्रकार जनार्दन चव्हाण, ढवण, भागवत दरेकर, मालती जाधव, किरण नवले, आबासाहेब दरेकर, वसंत दरेकर, प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका नीलिमा शिरसाठ, विद्यालयाचे पर्यवेक्षक सुदामराव माळी विद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी माजी विद्यार्थी विंचुर व पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी नागरिक, पालक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पोलिसांच्या नवीन संकेतस्थळाचे लोकार्पण

**नाशिक ।** १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडला.यावेळी नाशिक शहर पोलिसांच्या नवीन, नागरिक-केंद्रित, डेटा-आधारित आणि तंत्रज्ञानसक्षम संकेतस्थळाचे लोकार्पण करण्यात आले. उद्या प्रसंगी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक व पोलीस अधिकारी उपस्थित होते.या उपक्रमामुळे नागरिकांना पोलीस सेवांचा जलद आणि पारदर्शक लाभ मिळणार असून कायदा व सुव्यवस्था मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते प्रणाली साळीचा सत्कार**

**सिडको ।** १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने सिडको येथे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते जीएसटी विभागात टॅक्स असिस्टंट म्हणून निवड झालेल्या प्रणाली साळीचा भव्य सत्कार करण्यात आला. सिडकोच्या उदय कॉलनीतील एका साध्या, मध्यमवर्गीय कुटुंबातील कन्या असलेल्या प्रणालीने अथक मेहनत, अखंड चिकाटी आणि अढळ जिद्दीच्या जोरावर एमपीएससीची कठीण परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. या यशस्वी प्रवासात तिने नाशिक कलेक्टर ऑफिसमधील



महसूल सहाय्यक पदाची निवड मिळवली होती, मात्र आपल्या करिअरच्या दिशेचा विचार करून तिने जीएसटी विभागातील टॅक्स असिस्टंट पद स्वीकारण्याचा निर्णय घेतला. लवकरच ती या नव्या जबाबदारीची सूत्रे हाती घेणार आहे. या उल्लेखनीय यशामुळे प्रणालीच्या कर्तृत्वाचा सर्व स्तरातून गौरव होत आहे. परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून, तिच्या यशकथेतून अनेक तरुणांना प्रेरणा मिळत आहे. सत्कार समारंभात मान्यवरांनी प्रणालीच्या परिश्रमांची आणि कुटुंबाच्या निस्वार्थ पाठिंब्याची मनापासून प्रशंसा केली. "स्वप्न पूर्ण करण्यासाठी निर्धार, मेहनत आणि चिकाटी यांचा संगम आवश्यक असतो," असा प्रेरणादायी संदेशही यावेळी देण्यात आला.

# नाशिकच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचे प्रयत्न : ना. महाजन

## स्वातंत्र्यदिनी विभागीय महसूल आयुक्त कार्यालयात मुख्य ध्वजारोहण





**नाशिक ।** नाशिकच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विकासकामांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. या कामांना येत्या काळात अधिक गती देण्यात येईल, असे प्रतिपादन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मंत्री महाजन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी आमदार सीमा हिरे, आमदार नितीन पवार, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, मनपा अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर आदींची उपस्थिती होती. महाजन पुढे म्हणाले की, राज्य शासनाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. शंभर दिवसांच्या उपक्रमात विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हा परिषद कार्यालयाने सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने प्रभावी अंमलबजावणी केली. उत्कृष्ट ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांसाठी तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर प्रोत्साहन देण्यासाठी या वर्षापासून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

सध्या जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला आहे. याशिवाय, पाण्याचे महत्व लक्षात घेता, नारपार-गिरणा नदी जोड प्रकल्पासाठी जलसंपदा विभागाने ७ हजार ६४५ कोटी मंजूर केले आहेत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, उत्तर नाशिक आणि लगतच्या जळगाव आणि धुळे जिल्ह्यांमध्ये अधिक जमीन लागवडीखाली येणार आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा यासाठी मुदत ३० ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली आहे. जिल्ह्यातील ४ लाख ४३ हजार शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा २० वा हप्ता वितरणासाठी ८८.६६ कोटी रुपये वितरीत झाले आहेत. याबरोबरच खरीप आणि रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांना दिले असल्याचे महाजन यांनी यावेळी सांगितले. आगामी रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना बि-बियाणे, रासायनिक खते वेळेत उपलब्ध होतील याचे नियोजन करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. ॲग्रीस्टॅक म्हणजेच फार्मर आयडीसाठी प्रत्येक शेतकऱ्याने नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करून त्या माध्यमातून विविध विकास





कामांना चालना देण्यात आलेली आहे. यासर्व कामांसाठी राज्य शासनातर्फे कोणत्याही प्रकारे निधी कमी पडणार नाही. कुंभमेळ्याच्या आधी सर्व कामे गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही महाजन यांनी सांगितले. आगामी कुंभमेळ्यातील भाविकांची गर्दी लक्षात घेता नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे नवीन घाट प्रस्तावित केले आहेत. सर्व साधु-संत-महंत व विविध आखाड्यांचे प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध कामे केली जात आहे. पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, पायाभूत सोयीसुविधा, दळणवळणाची साधने आदींचे नियोजन केले जात आहे. कुंभमेळा हरित, स्वच्छ, पर्यावरणपूरक होण्यासाठी राज्य शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांना लोकसहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वरकरीता मंजूर विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रधान सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील साल्हेर किल्ल्याचा समावेश जागतिक वारसा मध्ये झाला आहे. यापूर्वीच राज्य शासनाने या किल्ल्याचे जतन व संवर्धनासाठी आवश्यक निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. जिल्ह्यातील पर्यटन आणि रोजगार वाढीस यामुळे चालना मिळणार असल्याचा विश्वास महाजन यांनी व्यक्त केला. जिल्ह्यात विविध अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, शिक्षण आदी क्षेत्रात विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. याशिवाय, विशेष साहाय्य योजनेच्या माध्यमातून वृद्धापकाळ, दिव्यांग योजना, निराधार योजना श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत असल्याची माहितीही महाजन यांनी यावेळी दिली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून विविध आवास योजनांचा लाभ जिल्ह्यातील लाभार्थ्यांना दिला जात आहे. तसेच, शिक्षणाबरोबरच नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे म्हणून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. जिल्हा रुग्णालयासह ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, महिला रुग्णालय, सामान्य रुग्णालय कार्यरत आहेत. याशिवाय गरजू रुग्णांना औषधोपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित केला असल्याची माहिती त्यांनी दिली. समृद्धी महामार्गाचा नाशिक-इगतपुरीचा अंतिम ७६ किलोमीटरचा टप्पा पूर्ण झाला असून, ग्रामीण भागातील पोर्ट कनेक्टिव्हीटी सुधारली आहे. तसेच, द्वारका चौकात कलंबोलीसारखा 8 फ्लाय ओव्हर मॉडेल विकसित केले जाणार असून, नाशिक-त्र्यंबकेश्वर मार्गाचे 6 लेनमध्ये रूपांतर ही होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी, वीर पत्नींना शासकीय जागेचे शेती प्रयोजनासाठी जमिनीचे वाटप, राष्ट्रपती पदक जाहीर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार, महसूल विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांचा सत्कार, जिल्हा परिषदेच्या सुपर ५० उपक्रमात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार, सुंदर गाव योजने अंतर्गत पुरस्कारप्राप्त गावांचा सत्कार, अवयवदान केलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांचा सन्मान, १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम अंतर्गत प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या विभाग व जिल्हास्तरीय कार्यालय प्रमुखांना प्रशस्तिपत्रक प्रदान, शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार, आवास योजनेत जिल्हास्तरावर चांगले काम करणाऱ्यांचा सत्कार आणि नाशिक हरित कुंभ स्पर्धेत पारितोषिक विजेत्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. या स्वातंत्र्यदिन सोहळ्यास स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, खेळाडू, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### 'प्राण'च्या सदस्यांसाठी आज क्रेडाई एक्सपो नमः नाशिकमध्ये ज्ञानसत्र



**नाशिक ।** प्रोफेशनल रिअल्टर्स असोसिएशन नाशिक (प्राण) संस्थेतर्फे त्यांच्या सदस्यांसाठी विविध विषयांवर ज्ञानसत्राचे आयोजन केले जाते. सध्या क्रेडाईतर्फे आयोजित नमः नाशिक प्रॉपर्टीचा महाकुंभ या प्रदर्शनानिमित्त ज्ञानसत्राचे आयोजन केले आहे. रविवारी (१७ ऑगस्ट) दुपारी २.३० पासून ठक्कर डोम येथे हे ज्ञानसत्र पार पडणार असल्याची माहिती अध्यक्ष राज तलरेजा, विक्रांत आव्हाड, प्रदीप रणधीर, नितीन कोतकर, गिरीश विजन, नितीन जांगडा, संजय दुसे यांनी केले आहे. यापूर्वी प्राण संस्थेतर्फे वेगवेगळ्या विषयावर २७ ज्ञानसत्र आयोजित केले आहेत. या सत्रांमध्ये व्यवसाय वृद्धी, सध्याचे आव्हाने, व्यवसाय वाढीसाठी उपलब्ध संधी यासह इतर विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शनांनी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन केले आहे. या सत्रांचा सदस्यांना त्यांच्या व्यवसायात प्रगती करण्यासाठी खूप फायदा झाला आहे. हीच श्रृंखला पुढे नेताना प्राण संस्थेतर्फे २८ वे ज्ञानसत्र आयोजित केले आहे. या सत्रासाठी क्रेडाई नाशिक हे सहआयोजक आहेत. रविवारी (१७ ऑगस्ट) दुपारी २.३० पासून त्र्यंबकेश्वर रोडवरील, एबीबी सर्कलजवळील ठक्कर डोम येथे हे सत्र पार पडणार आहे. यावेळी मुंबई येथील 'ब्रोकर की पाठशाला' चे संस्थापक श्री. विनोदजी ठक्कर हे रियल इस्टेट क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांसाठी प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन करणार आहेत.

### साहित्याच्या अंतरंगात परिवर्तनाची सत्यता : दिलीप पाटील

**नाशिक ।** साहित्यनिर्मिती ही आतून येते, तेव्हाच ती वाचकाला वाचनानंदासह विचारप्रवर्तक ठरत असते. साहित्याच्या अंतरंगात नेहमी परिवर्तनाची सत्यता असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी दिलीप पाटील यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारक येथे आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या अभिनव उपक्रमात कवी दिलीप पाटील 'दुरून कुठून तरी' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करत होते. अध्यक्षस्थानी वसंत व्याख्यानमालेचे




अध्यक्ष श्रीकांत बेणी होते. दिलीप पाटील पुढे म्हणाले की, सामान्य माणूस जगण्याची धडपड, होणाऱ्या वेदना सहन करतो. तरीही तो जगण्याची उमेद सोडत नाही. वर्षानुवर्षे कष्ट सोसत हतबल न होता दुरून कुठून तरी आशेचा किरण त्याला दिसतो. भोवताली निराशा असली तरी आशावाद मात्र शाश्वत असला पाहिजे. समाजव्यवस्था बदलत असताना माणसांमधली माणूसपणाची ओल कमी होत आहे. याचे चिंतन या कविता संग्रहात मांडण्याचा प्रयत्न केला आहे, असे सांगून संग्रहातील काही कविताही त्यांनी सादर केल्या.

### लक्ष्मीबाई पवार यांचे निधन



**नाशिक ।** येथील लक्ष्मीबाई निंबाजीराव पवार (वय ९५) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, चार मुली, नातवडे, पतवंडे असा परिवार आहे. प्रसिद्ध छायाचित्रकार हिरामण सोनवणे यांच्या त्या आजी होत.

### कांताबाई पानगव्हाणे यांचे निधन



**नाशिक ।** उगांव येथील कांताबाई साहेबराव पानगव्हाणे (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पती, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. ओम शांती पेट्रोल पंपाचे संचालक पंडीत, बाळासाहेब व संगीता मोगल यांच्या त्या आई होत.

### इब्राहिम गुलाम मोहम्मद जीन यांचे निधन



**नाशिक ।** माजी नगरसेवक सुफी जिन यांचे वडील इब्राहिम गुलाम मोहम्मद जीन यांचे निधन झाले. त्यांच्या राहत्या घरी कोकणीपुरा अंतदर्शन करून पीर मोहना शहा कब्रस्तान येथे अंत्यविधी करण्यात आला.

### इंदूताई क्षीरसागर यांचे निधन



**नाशिक ।** निफाड तालुक्यातील शिवडी येथील प्रगतशील शेतकरी इंदुबाई (ताई) रामनाथ क्षीरसागर यांचे वृद्धापकाळाने शुक्रवारी (दि. १५) सायंकाळी दुःखद निधन झाले. शनिवारी सकाळी श्रीक्षेत्र शिवडी, निफाड येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मविप्रचे सभापती तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर यांच्या त्या मातोश्री होत.

### चुकीची दुरुस्ती

ग्रुप ग्रामपंचायत दातली, ता. सिन्नर. जि. नाशिक या जाहिरात मधील जाहीर निविदा सूचना दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली . त्यात अंदाजपत्रकीय किंमत रुपये २३५७७/- असे झाले आहे. त्या ऐवजी रुपये २३५७१७/- असे वाचावे.

# मनपात आयुक्तांच्या हस्ते ध्वजारोहण

## तिरंगा सायकल रॅलीं, बाईक रॅली, फोर व्हीलर रॅलीद्वारे जल्लोष



**नाशिक ।** भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन महापालिका मुख्यालय, राजीव गांधी भवन येथे अति उत्साहात साजरा झाला. सकाळी ८.०५ वाजता माननीय आयुक्त मनिषा खत्री यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीताच्या गजरात, तिरंग्याच्या साक्षीने परिसर देशभक्तीच्या भावनेने प्रेरित झाला. यानंतर ८.१५ वाजता आयुक्त यांच्या हस्ते सॅटर्डे संडे ग्रुपच्या तिरंगा सायकल रॅली, बाईक रॅली आणि फोरव्हीलर रॅली यांना हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. देशभक्तीपर घोषणांनी शहराच्या रस्त्यांवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. ८.२० वाजता, संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त आयुक्त खत्री आणि अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळीं सामूहिक पसायदान वाचन करण्यात आले. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, स्मिता झगडे, उपआयुक्त लक्ष्मीकांत साताळकर, अजित निकत, नितीन पवार, नितीन नेर, शहर अभियंता नितीन पाटील, अधीक्षक अभियंता अविनाश धनाईत, रवींद्र धारणकर, उद्यान अधिक्षक विवेक भदाने, मुख्य लेखाअधिकारी दत्तात्रय पाथरुट, मुख्य लेखापरीक्षक बळवंत गायकवाड, उपसंचालक नगर नियोजन दिपक वराडे, शहर विकास अधिकारी प्रशांत सोनवणे, शिक्षण अधिकारी डॉ. मिता चौधरी, कार्यकारी अभियंता प्रशांत पगार, बाजीराव माळी, गणेश मैड, आर.एम. शिंदे, संदेश शिंदे, सचिन जाधव, नितीन पाटील, अनिल गायकवाड, शैलेंद्र जाधव, वैद्यकीय अधिकारी विजयकुमार देवकर, स्वीय सचिव दिलीप काठे, सहाय्यक आयुक्त प्रशासन रमेश बहिरम, विभागीय अधिकारी राजाराम जाधव, चंदन घुगे, मदन हरिश्चंद्र, तसेच जनसंपर्क विभागातील मनिषा पाटेकर, शंकर पोरजे, रमेश पागे, दिपक बंद्रे, मनपातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क विभागाच्या मनिषा पाटेकर यांनी केले.

# तंत्रज्ञानामुळे पोलिस प्रशासनाची कार्यपद्धती लोकाभिमुख होणार : ना. महाजन

## विकसित सॉफ्टवेअर व कार्यालय सुशोभीकरणाचे उद्घाटन



**नाशिक ।** नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व संरक्षणासाठी गृह विभाग महत्त्वाचे काम करत असून, जास्तीत जास्त आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरातून या विभागाचे कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख होण्यास होणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या १५० दिवस सुधारणा कायक्रम अंतर्गत नाशिक परिक्षेत्र पोलिस दलासाठी विकसित सॉफ्टवेअर व कार्यालय सुशोभीकरण उदघाटन सोहळाप्रसंगी महाजन बोलत होते. यावेळी यावेळी आमदार सीमा हिरे, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, नाशिक शहर पोलिस आयुक्त संदीप कर्णिक पोलिस अधीक्षक (ग्रामीण) बाळासाहेब पाटील यांच्यासह पोलीस अधिकारी, अंमलदार व कर्मचारी उपस्थित होते. महाजन म्हणाले की, गुन्ह्यांची उकल करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे होताना दिसत आहे. यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना वाढीस लागली आहे. आगामी कुंभमेळा स्वच्छ, सुंदर व सुरक्षित होण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी टास्क मॅनेजर ॲल्पिकेशन, व्हिजिटर्स मॅनेजमेंट सिस्टिम, ई-डेली क्राईम रिपोर्ट्स प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. यासोबतच पोलीस आयुक्त नाशिक कार्यालयाचे नवीन शासक नव्हे सेवक या संकेतस्थळाचे उदघाटनही करण्यात आले. विशेष पोलीस महानिरीक्षक कराळे यांनी प्रास्ताविकातून शुभारंभ झालेल्या तीनही ॲप्सची माहिती व कार्यप्रणाली विषद केली.

# अतिदक्षता विभाग निर्मितीचे आ. सीमा हिरेंचे कार्य कौतुकास्पद : ना. महाजन





**नाशिक ।** रूग्ण सेवा म्हणजेच खरीखुरी ईश्वर सेवा आहे. गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील रूग्णांची सेवा करण्यात मी आधिकाधिक वेळ देत असतो. त्या निमित्ताने मला रूग्ण सेवा करण्याची मोठी संधी मिळते हे माझे भाग्यच आहे.औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना अधिक व्यापक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ईएसआय रुग्णालयात सर्व सोयी -सुविधांनी सुसज्ज असा अतिदक्षता कक्षाची उभारणी केल्याचे आमदार सीमाताई हिरे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जलसंपदामंत्री नामदार गिरिष महाजन यांनी केले आहे.

औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना सेवा देण्यासाठी आ. सीमा हिरे यांच्या प्रयत्नातून सातपूर येथील ईएसआय रुग्णालयात उभारण्यात आलेल्या अतिदक्षता कक्षाच्या लोकार्पण कार्यक्रमात बोलतांना नामदार गिरीष महाजन यांनी वरील प्रतिपादन केले.यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष सुनिल केदार, सुनिल बागूल, निमाचे अध्यक्ष आशिष नहार, महेश हिरे, मामा राजवाडे, नगरसेवक सतीश सोनवणे, श्याम बडोदे, राकेश दोंदे, मुकेश शहाणे, प्रतिभा पवार, माधुरी बोलकर, छाया देवांग, वर्षा भालेराव, भाग्यश्री ढोमसे, पुष्पा आव्हाड, कावेरी घुगे, वैद्यकीय अधिक्षक डॉ.बी.एन.पावरा या मान्यंवरांसह विविध कंपन्यांच्या युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते. भाषणाच्या प्रारंभीच ना.महाजन यांनी रूग्णालयात आयसीयू कक्षाची उभारणी केल्या प्रकरणी आ. सीमा हिरेंचे अभिनंदन केले.रूग्ण सेवा हिच खरी इश्वरसेवा असे मानत मी गेल्या अनेक वर्षापासून यासाठी झटत असल्याचे सांगत राज्य आणि केंद्राच्या आरोग्या विषयक असलेल्या विविध योजनांची माहिती सांगितली.आरोग्य सेवेसाठी मी सततच तत्पर असल्याचे स्पष्ट्र करत मुंबईत मोफत उपचार हवे असल्यास आ.हिरेंच्या माध्यमातून कधीही माझ्याशी संपर्क साधा असे आवाहनही यावेळी ना.गिरीष महाजन यांनी केले.आमदार हिरे सतत विकासासाठी झटत असतात. त्यांच्या भाषणात त्यांनी मागणी केलेले सर्व विकासकामे मार्गी लावणार असल्याची ग्वाही ना.महाजन यांनी दिली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडल अध्यक्ष नारायण जाधव, वैभव महाले, राहूल गणोरे, जितेंद्र चोरडिया, अजय बागूल, राजेश दराडे, रामहरि सभेराव, गौरव बोडके, आर.आर.पाटील, प्रकाश चकोर, संदीप देवरे, अनिल भालेराव, निलेश जोशी, बाळा निगळ या पदाधिकाऱ्यांसह रूग्णालयाचे डॉ.बी.एन.पावरा, डॉ.महेश दांडगे, डॉ.नंदकुमार राऊत, डॉ.सरोज जवादे, प्रशांत पंडित, विलास पगार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# शहराच्या प्रगतीत 'क्रेडाई'चे योगदान मोलाचे

## नमः नाशिक- प्रॉपर्टीचा महाकुंभ या प्रदर्शनाचे उद्घाटन




**नाशिक ।** आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक मध्ये अनेक विकासपूर्वक कामे होणार असून यांमध्ये रिंग रोड, तसेच रस्ते, हवाई आणि रेल्वे सुविधांमध्ये भर पडणार आहे. नाशिक च्या बांधकाम व्यवसायिक यांची प्रतिमा देशभरात चांगली असून शहर विकास तसेच अनेक सामाजिक कार्यात क्रेडाई चे योगदान मोलाची असल्याचा सूर राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ व जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री मंत्री गिरीश महाजन यांनी काढला. ते क्रेडाई नाशिक मेट्रो आयोजित नमः नाशिक - प्रॉपर्टीचा महाकुंभ या प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी आ. सीमा हिरे , आ.राहुल आहेर, क्रेडाई नाशिक मेट्रो चे अध्यक्ष गौरव ठक्कर, मानद सचिव तुषार संकलेचा , एक्स्पो चे समन्वयक ऋषिकेश कोते , नरेंद्र कुलकर्णी, आय पी पी कुणाल पाटील , एक्स्पो कमिटी प्रमुख मनोज खिवंसरा , उपाध्यक्ष उदय घुगे, अंजन भलोडिया , अनिल आहेर व मुख्य प्रायोजक दिपक बिल्डर्स अँड डेवलपर्स चे संचालक दिपक चंदे हे मंचावर उपस्थित होते .ठक्कर डोम येथे आयोजित हे प्रदर्शन १८ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे. दीप प्रज्वलन करून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या भाषणात महाराष्ट्र राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ म्हणाले की शहराचा विकास हा पर्यावरण सांभाळून केला पाहिजे तसेच गोदावरी स्वच्छ ठेवणे हे महत्वाचे असून आजमितीला देखील गोदावरी पत्रात प्रक्रिया न करता सांडपाणी सोडले जात असल्याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली. आपले मनोगत व्यक्त करताना जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, नाशिक अध्यात्मिक आणि धार्मिक वारसा लाभलेली शैक्षणिक आणि पर्यटन तसेच उद्योगाच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर आहे येणाऱ्या कुंभमेळ्यच्या निमित्ताने शहराची वेगळी ओळख तयार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित आले पाहिजे असेही त्यांनी आवाहन केले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी क्रेडाई नाशिक मेट्रोचे मानद सचिव तुषार संकलेचा, एक्सपो कमिटीचे प्रमुख मनोज खिवंसरा, आयपीपी कृणाल पाटील, उपाध्यक्ष उदय घुगे, अनिल आहेर, अंजन भालोदिया, कोषाध्यक्ष श्रेणिक सुराणा, सहसचिव सचिन बागड, हंसराज देशमुख, मॅनेजिंग कमिटी सदस्य श्यामकुमार साबळे, अनंत ठाकरे, विजय चव्हाणके, सागर शाह, निशित अटल, सुशील बागड, निरंजन शाह, वृषाली हिरे, दीपाली बिरारी, सहयोगी सदस्य सतीश मोरे, सुशांत गांगुर्डे, अभिषेक महाजन, समीर सोनवणे, मनोज लाडानी, हर्षल हणमंते, भूषण कोठावदे, शिवम पटेल, हिरेन भडजा, मयुरेश चौधरी, ऋषभ तोडरवाल, क्रेडाई युवा विंग समन्वयक आदित्य भातंबरेकर, सह समन्वयक अजिंक्य नाहर हे विशेष सहकार्य करत आहेत.

# पोल्ट्री फार्ममधील देशी दारूचा अड्डा उद्ध्वस्त

## ५७ लाखांचा मुद्देमाल जप्त । दारू माफियांना मोठा झटका




**नाशिक ।** जिल्ह्यात अवैध दारूनिर्मिती करणाऱ्या रॅकेटवर उत्पादन शुल्क विभागाचा धडक छापा. इगतपुरी तालुक्यातील भावली शिवारातील बंद पडलेल्या पोल्ट्री फार्ममध्ये सुरू असलेला देशी दारू तयार करण्याचा मोठा अड्डा उध्वस्त करत तब्बल ५७ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १४ ऑगस्ट रोजी राज्य उत्पादन शुल्क 'ड' विभागाचे निरीक्षक एन.एच. गोसावी यांच्या पथकाने ही कारवाई केली. छाप्यात २,२०० लिटर बनावट देशी दारू भरलेले ३८० बॉक्स, इलेक्ट्रिक मोटार, बॉटलिंग मशीन, बॅरल्स, रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक झाकण, बनावट लेबल, मोजमाप उपकरणे, दुचाकी व चारचाकी वाहन असा मोठ्या प्रमाणावर साहित्य जप्त करण्यात आले.

कारवाईदरम्यान सचिन अण्णा भूसनर (रा. मोरेगाव, नांदगाव) व आकाश बाळासाहेब निंबाळकर (रा. मोहेगाव, नांदगाव) या दोघांना गजाआड करण्यात आले असून, राहुल धर्मा डगळे, दिनेश गायकवाड आणि जागा मालक इचम हे तिघे फरार आहेत. त्यांचा शोध पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई आयुक्त डॉ. राजेंद्र देशमुख, अधीक्षक संतोष झगडे आणि उपाधीक्षक अमृत तांबारे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक एन.एच. गोसावी, एम.आर. इंगळे, आर.एन. सोनार आदी अधिकाऱ्यांनी केली.अवैध दारूनिर्मिती, विक्री किंवा वाहतूक करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही.असा इशारा राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिला आहे. अवैध मध्य निर्मिती वाहतूक किंवा विक्री संदर्भात तात्काळ टोल-फ्री १८००२३३९९९९ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ९४२३९८८००० वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दर्जेदार प्रवास सेवा देण्याचे ध्येय ठेवूनच 'बीयाँड पॅराडाईज' कंपनीने वाटचाल करावी : खा. वाजे






**नाशिक ।** पर्यटनाला नवी ओळख देण्यासाठी 'बीयाँड पॅराडाईज' या कंपनीच्या माध्यमातून पर्यटकांना एक अविस्मरणीय अनुभव मिळणार आहे. जगभरातील व स्थानिक संस्कृती, निसर्गरम्य स्थळे आणि ऐतिहासिक ठिकाणांना भेट देण्याची संधी पर्यटकांना उपलब्ध करून देणारी नवीन कंपनी नाशिकमध्ये सुरू होत आहे. सर्वांसाठी परवडणाऱ्या दरात दर्जेदार प्रवास सेवा देणे, हे ध्येय ठेवूनच या कंपनीने वाटचाल करावी, असे आवाहन नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी व्यक्त केले.

नाशिक येथे महात्मानगर परिसरात 'बीयाँड पॅराडाईज' या टूर्स अँड ट्रॅव्हल कंपनीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिन्नर तालुका सहकारी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन नामकर्ण आवारे उपस्थित होते. 'स्टाईस'चे व्हा. चेअरमन अग्रवाल, दैनिक 'महासागर'चे संपादक प्रा. जयंत महाजन उपस्थित होते. टूर्स अँड ट्रॅव्हल कंपनीच्या सर्वेसर्वा आशा सिंग व हर्षल उगले यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. खा. वाजे पुढे म्हणाले की, जगभर भ्रमंती म्हणजे जगभरात प्रवास करणे किंवा फिरणे. अनेक लोकांना जग फिरण्याची आवड असते. काही जण हौस म्हणून फिरतात, तर काही जण कामासाठी किंवा शिक्षणासाठी प्रवास करतात. जगभर फिरल्याने वेगवेगळ्या संस्कृती, खाद्यपदार्थ आणि जीवनशैली अनुभवता येतात, ज्यामुळे ज्ञान आणि अनुभव वाढतो. जगभर भ्रमंती करण्याचे अनेक फायदे असल्याचे सांगून सर्वसामान्यांना परवडेल अशा किमतीत टूर्स आयोजित कराव्यात असेही खासदार वाजे यांनी सांगितले. कंपनीच्या संचालिका आशा सिंग यांनी सांगितले की, आम्ही पर्यटकांना त्यांच्या आवडीनुसार आणि गरजेनुसार विविध टूर पॅकेज देऊ. सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. सर्वांच्या शुभेच्छांमुळे आणि आशीर्वादाने कंपनीचा प्रवास नक्कीच यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पर्यटनाच्या क्षेत्रात एक नवीन इतिहास घडवू. हर्षल उगले यांनी आभार मानले.

**भ्रमंतीच्या आठवणी आयुष्यभर सोबत राहतात-** 'स्टाईस'चे चेअरमन नामकर्ण आवारे म्हणाले की, वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या संस्कृती, परंपरा, आणि जीवनशैली असतात. जगभर फिरल्याने या सगळ्या गोष्टी जवळून पाहता येतात आणि अनुभवता येतात. वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास केल्याने जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो आणि नवीन गोष्टी शिकायला मिळतात. नवीन ठिकाणी गेल्यावर स्वतःच्या आवडीनिवडी, क्षमता आणि मर्यादांची जाणीव होते. प्रवास करताना अनेक नवीन माणसे भेटतात, ज्यामुळे मैत्रीचे आणि सामाजिक संबंधांचे जाळे विणले जाते. जगभर केलेल्या भ्रमंतीच्या आठवणी आयुष्यभर सोबत राहतात. जगभर फिरण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. काही जण पर्यटन कंपन्यांच्या मदतीने दौरे करतात, तर काही जण स्वतःच नियोजन करून प्रवास करतात. मराठी माणूस जगभर भ्रमंती करू शकतो हे जगाला दाखवून देणारे आणि मराठी लोकांना प्रवासाची सवय लावणारी माणसं मराठीच आहे. प्रत्येकालाच फिरण्याची, भटकण्याची आवड असते. एकदा तरी परदेशवारी करावी असं स्वप्न आपण नेहमी पाहतो. काही वेळा हे स्वप्न सत्यात उतरतंही पण काही वेळा परदेशवारीचं हे स्वप्न अपूर्ण राहतं. त्यासाठी 'बीयाँड पॅराडाईज'सारख्या कंपन्या सहकार्य करतात.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219

# 'ईडी'ची सर्वोच्च कानउघाडणी

पैलू
अजय तिवारी

**गेल्या काही दिवसांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'ईडी'वर ताशेरे ओढले. या तपास यंत्रणांना हाताशी धरून सत्ताधारी आपले ईप्सित साध्य करण्याचा प्रयत्न करतात; परंतु या प्रकरणात तपास यंत्रणांची विश्वासार्हता कमी होते. सर्वोच्च न्यायालयाने तपास यंत्रणांवर बोट ठेवताना त्यांना समज दिली; परंतु त्यातून त्या बोध घेणार का, पिंजऱ्यातला पोपट होण्यात धन्यता मानणार का, याची उत्तरे येणाऱ्या काळात मिळतील.**

अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने 'ईडी'ला गुंडासारखे वागू नका, अशी समज दिली. पूर्वीही एका प्रकरणात न्यायालयाने ईडी आणि सीबीआयला फटकारले होते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, खटला लांबवून आरोपीला अमर्यादित काळ तुरुंगात ठेवता येणार नाही. तपासात विलंब होण्यापासून आरोपपत्र दाखल करण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही तपास यंत्रणांना चांगलेच सुनावले होते. छत्तीसगडच्या बहुचर्चित दारू घोटाळ्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) कामकाजावर कडक टिप्पणी केली. अरविंद सिंहच्या जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती अभय एस. ओका म्हणाले की 'ईडी' पुरेशा पुराव्याशिवायच आरोप करते, ही आजकालची एक पद्धत बनली आहे. आरोपीचा कंपनीशी थेट संबंध सिद्ध होत नसताना ४० कोटी रुपयांच्या बेकायदेशीर कमाईचा दावा कोणत्या आधारावर केला जात आहे? आम्ही अनेक प्रकरणांमध्ये पाहिले आहे की तुम्ही फक्त आरोप करता; परंतु कोणतेही पुरावे देत नाही. महिनोनमहिने तपास सुरू ठेवून पुरवणी दोषारोपपत्रे दाखल करत जायचे आणि जामीन मिळवण्याच्या संशयितांच्या अधिकारांची पायमल्ली करायची, हे अजिबात चालणार नाही. ठरलेल्या मुदतीत तपास पूर्ण होत नसेल, तर तो पूर्ण होईपर्यंत अटकच करू नका. आरोपींना जामिनावर सोडले, तर ते साक्षीदारांवर दबाव आणतील, पुरावे नष्ट करतील असे सरकारी वकिलांनी म्हटले तेव्हा असे घडले तर जामीन रद्द करण्यासाठी न्यायालयात येण्याची सुविधा तपास यंत्रणेला उपलब्ध आहे, असे न्यायालयाने निदर्शनास आणले. या ताज्या चर्चेनिमित्त एका जुन्या विषयाला नव्याने तोंड फुटले.

'ईडी' या केंद्रीय तपास यंत्रणेची कामाची पद्धत, विशेषत: 'मनी लॉँड्रिंग' प्रकरणांमधील तपास भल्याभल्यांच्या अंगावर काटा आणणारा आहे. साधारणत: 'ईडी'चे पथक छापा टाकते, संबंधितांना चौकशीसाठी बोलावते, तासन्तास बसवून ठेवते. काहीजण उशिरा 'ईडी' कार्यालयातून बाहेर पडल्याचे, तर बहुतेकांना रात्री उशिरा कधी तरी अटक करण्यात आल्याचे अनेक प्रकरणांमध्ये देशाने पाहिले आहे. 'मनी लॉँड्रिंग' कायद्यातील काही कलमे अत्यंत जाचक आहेत. त्यामुळे जामीन मिळणे सोपे राहत नाही. त्यातच विरोधी पक्षांच्या नेत्यांनाच या ना त्या निमित्ताने या कायद्याखाली अडकवण्यात आल्याचा आणि त्यापैकी काहीजण नंतर सत्ताधारी पक्षात गेले, की प्रकरणे थंड्या बस्त्यात टाकल्याचा आरोप सतत होत आला आहे. या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी महत्त्वाची आहे. फौजदारी दंडसंहितेनुसार गंभीर प्रकरणामध्ये संशयितांच्या अटकेनंतर तपास पूर्ण करून ९० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करणे तपास यंत्रणेवर बंधनकारक आहे. अन्यथा, आरोपी जामीन मिळण्यास पात्र ठरतात. 'ईडी'ने मात्र अत्यंत हुशारीने या नियमातून पळवाट शोधली. 'डिफॉल्ट बेल'ची मुदत संपण्याच्या आत जुजबी दोषारोपपत्र दाखल करून तपास सुरू असल्याचे सांगायचे, नंतर ठराविक कालावधीनंतर एकापेक्षा अनेक पुरवणी दोषारोपपत्रे दाखल करत जायचे आणि त्याच वेळी तपास पूर्ण झाला नसल्याचे सांगत संशयितांच्या जामीन अर्जाला विरोध करत रहायचा, अशा आशयाच्या या पळवाटेवर नेमके बोट ठेवून सर्वोच्च न्यायालयाने 'ईडी'च्या चलाखीवर ताशेरे ओढले आहेत.

या पार्श्वभूमीवर 'ईडी'च्या फेऱ्यात अडकलेल्या अनेक नेत्यांचा जामीनावर बाहेर येण्याचा मार्ग आता मोकळा होऊ शकेल. आर्थिक गुन्ह्यांची प्रकरणे तपासासाठी किचकट असतात हे खरे. त्यामुळे त्यांचा तपास तीन महिन्यांमध्ये पूर्ण होईलच असे नाही. तथापि, तपासाच्या सुरुवातीलाच संशयितांना अटक करण्याऐवजी तपास आटोक्यात आल्यानंतरच अटकेचा विचार करता येऊ शकतो. पुरवणी दोषारोपपत्रांना पायबंद बसला तर त्या पुरवण्यांमधून हव्या त्या आरोपींची नावे वगळण्याचा, हवी त्यांची नावे वाढवण्याचा प्रकारही कमी होईल. सर्वोच्च न्यायालयाने ईडीच्या कार्यवाहीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. 'ईडी'ने हरयाणाचे माजी आमदार सुरेंद्र पवार यांची रात्री उशिरापर्यंत चौकशी केली. ही चौकशी सुमारे १५ तास आणि मध्यरात्रीनंतर चालली. न्यायालयाने याला अतिरेकी आणि अमानवी वर्तन म्हटले आहे. 'ईडी'ने बेकायदेशीर खाणकामाशी संबंधित 'मनी लॉँड्रिंग' प्रकरणात पवार यांना अटक केली होती; परंतु पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने अटक रद्द केली. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला 'ईडी'ने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने 'ईडी'चे अपील फेटाळले आणि उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. न्यायालयाने ईडीच्या काम करण्याच्या पद्धतीवर चिंता व्यक्त केली. मानवी हक्क लक्षात घेऊन चौकशी करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.



कलम २१ अंतर्गत दिलेल्या आदेशानुसार 'ईडी' भविष्यात अशा प्रकरणांमध्ये एखाद्या दिवशी इतका वेळ अनावश्यक छळ करण्याऐवजी, संयुक्त राष्ट्रांनी घालून दिलेल्या मूलभूत मानवी हक्कांनुसार आरोपींच्या निष्पक्ष चौकशीसाठी काही आवश्यक व्यवस्था स्थापित करेल, अशी अपेक्षाही न्यायालयाने व्यक्त केली आहे. सलग १५-१६ तास चौकशी हे 'ईडी' अधिकाऱ्यांनी केलेले अमानुष वर्तन असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. हे प्रकरण दहशतवादी कारवायांशी संबंधित नसून बेकायदेशीर वाळू उत्खननाचा खटला आहे आणि अशा प्रकरणात लोकांशी असे वागले जाऊ नये, असे न्यायालयाने म्हटले. आमदार पवार यांची सुरुवातीची अटक तसेच अटकेचे कारण कायद्याने टिकाऊ नव्हते आणि 'ईडी'कडे श्री. पवार यांना गुन्हेगारीतून मिळालेल्या रकमेशी संबंधित कोणत्याही प्रक्रियेत किंवा कृतीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असल्याचे सिद्ध करणारे कोणतेही पुरावे नव्हते. हरयाणा, छत्तीसगड, कर्नाटक, दिल्ली तसेच अन्य ठिकाणच्या प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'ईडी', 'सीबीआय'सह अन्य तपास यंत्रणांवर ओढलेले ताशेरे आणि त्याबाबत केलेल्या टिप्पण्या या मौखिक असतात. त्यात आदेश नसतो. त्यामुळे तपास यंत्रणा त्या गांभीर्याने घेत नाहीत. औपचारिक लिखित आदेशांनाच महत्त्व मिळते. न्यायालयाची मौखिक अथवा अनौपचारिक मते अथवा टिप्पणी यांना कुठल्याही प्रकारे कायदेशीर महत्त्व प्राप्त होत नाही.

अनेक पक्ष, अभ्यासक, विश्लेषकांना न्यायालयीन निकालांवर आपले मौखिक मत मांडण्याचे अभिव्यक्तीस्वातंत्र्य आहे, त्याचप्रमाणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे न्यायाधीशांचे अधिकार वगळता येणारे नाहीत. राज्यघटनेतील परिशिष्ट तीनअंतर्गत न्यायाधीशांच्या शपथेमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा ते त्याग करतील, असा कुठलाच उल्लेख नाही. न्यायाधीशांची मौखिक अथवा अनौपचारिक टिप्पणी, मते कायदेशीर तत्त्वांमध्ये ग्राह्य धरता येणारी नसल्याने नक्कीच असंवैधानिक ठरत नाहीत. थोडक्यात, न्यायदानाच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत अशी तोंडी ताकीद, इशारे, ताशेरे हे सारेच नगण्य ठरते. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांचे युक्तिवाद फेटाळले असले, तरी मौखिक ताशेऱ्यांचा 'ईडी'च्या कार्यपद्धतीवर काही परिणाम झाला का, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. सर्वोच्च न्यायालय वारंवार थपडा लगावत असूनही अंमलबजावणी संचालनालया(ईडी)चा कारभार सुधारायला तयार नाही. न्यायालयाचे ताशेरे अनेकदा तोंडी असल्याने त्याचे गांभीर्य यंत्रणेच्या लक्षात येत नसावे. पिंजऱ्यातल्या पोपटापासून सुरू झालेला तपास यंत्रणांचा प्रवास आता सत्ताधारी पक्षाने 'छू' म्हटले, तर धावून जाणाऱ्या कुत्र्यापर्यंत झाला आहे. सामान्यांच्या अधिकारांचा संकोच करण्याबरोबरच त्यांच्या मनात अकारण भीती निर्माण करण्याचे काम 'ईडी'सारख्या यंत्रणेने केले असून तपास यंत्रणांवरचा विश्वास उडत असेल, तर ती चांगली गोष्ट नाही.

✦✦✦

# डिजिटल ॲक्सेसला मूलभूत अधिकार

तंत्रवेध
डॉ. दीपक शिकारपूर



**'डिजिटल इंडिया' मोहिमेने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहनावर, सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे. कसा घडतोय हा बदल? त्यासाठी सरकारी उपक्रम कोणती भूमिका बजावत आहेत?**

तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातील अब्जावधी लोकांच्या जीवनामध्ये फार वेगाने बदल घडताना आपण पाहतो आहोत. या सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानांमध्ये माहिती आणि संवादाचे तंत्रज्ञान (इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी) सर्वात आघाडीवर आहे. यामुळे पूर्वी असलेले अंतराचे बंधन आता नाहीसे झाले असून आज सर्वांना सर्व प्रकारची माहिती मिळू शकते तसेच परस्परांशी गतिशील संवादही होऊ शकतो. अशा प्रकारे सर्व जग जोडले जाऊन 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे. आता इंटरनेटचे जाळे अनेक पटींनी पसरेल आणि ग्रामीण, गरीब आणि दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या कोट्यवधी नागरिकांना त्याचा फायदा होईल. हवा, पाणी, निवारा याप्रमाणेच ही एक अत्यावश्यक गरज आहे. जगभरातील लोक शिक्षण, आरोग्यसेवा, काम आणि निवास यासारख्या सामाजिक-आर्थिक मानवी हक्कांचा वापर करण्यासाठी इंटरनेटवर इतके अवलंबून आहेत की ऑनलाइन प्रवेश हा आता मूलभूत मानवी हक्क मानला पाहिजे. विकसनशील देशांमध्ये, इंटरनेटचा वापर (डिजिटल डिव्हाइड) हा एक मूलभूत फरक असू शकतो. आपल्या देशात हे शक्य आहे का, याबाबत अनेक मते असू शकतात, सरकारी साधनसामुग्री आरोग्य, पाणी, पायाभूत सुविधा (रस्ते) यावर जास्त भर दिला जावा असा अनेकांचा दृष्टिकोन असू शकतो. इंटरनेट, डिजिटल क्सेस या सर्व चैनीच्या गोष्टी आहेत, असे अनेकांचे मत आहे. इथेच दृष्टिकोन बदलायची गरज आहे.



सर्वोच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात म्हटले आहे की, डिजिटल प्रवेश हा कलम २१ अंतर्गत जीवन आणि स्वातंत्र्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे. सरकारला डिजिटल विभाजन कमी करून सर्वांना समान डिजिटल क्सेस सुनिश्चित करावा लागेल; जेणेकरून शिक्षण, आरोग्य, शासकीय सेवा आणि आर्थिक संधींमध्ये कोणालाही मागे रहावे लागणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की ग्रामीण लोकसंख्येच्या मोठ्या भागांमध्ये, ज्येष्ठ नागरिकांमध्ये, आर्थिकदृष्ट्या दुर्बलांमध्ये, भाषिक अल्पसंख्याकांमध्ये आणि दिव्यांगांमध्ये डिजिटल विभाजन अस्तित्वात आहे. न्यायालयाने विशेषतः बँक आणि इतर सेवांसाठी असलेल्या 'नो युवर कस्टमर' प्रक्रियेत सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत; जेणेकरून दृष्टीबाधित आणि शारीरिकदृष्ट्या अक्षम व्यक्तींनादेखील डिजिटल सेवांचा सहज लाभ घेता येईल. यासाठी ब्रेल आणि आवाज-आधारित पर्यायांचा विचार करण्याचे न्यायालयाने सांगितले आहे. फार पूर्वीपासून माणसाच्या रोटी-कपडा-मकान या मूलभूत गरजा मानल्या गेल्या आहेत. बदलत्या काळानुसार यामध्ये भर घालून बिजली-बँडविड्थ या दोन बाबींचाही समावेश केला गेला पाहिजे. इ-शासनासारख्या संकल्पना निव्वळ प्रसिद्धीपुरत्या मर्यादित न ठेवता खरोखरीच सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवायच्या असतील तर हे करणे अनिवार्य आहे. युरोपमधील फिनलंड ह्या देशाने हे प्रत्यक्ष करूनही दाखवले आहे. ब्रॉडबँड इंटरनेट ऍक्सेस हा तेथील नागरिकांचा मूलभूत हक्क मानणारा कायदा २०१० मध्येच संमत झाला आहे. जगातले असे हे पहिलेच उदाहरण आहे.

फिनलंडच्या कायद्यानुसार, प्रत्येक नागरिकाला किमान एक (मेगाबाईट प्रति सेकंद) गतीचे ब्रॉडबँड कनेक्शन मिळवण्याचा हक्क आहे. तसेच २०१५ पर्यंत ही गती १०० मेगाबाईटपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. फिनलंडने हे पाऊल उचलण्यामागे हेतू हा होता की इंटरनेट आता केवळ मनोरंजनाचे साधन राहिलेले नाही, तर दैनंदिन जीवनाचा आवश्यक भाग बनले आहे. शिक्षण, सरकारी सेवा, बँकिंग आणि इतर अनेक महत्त्वाच्या कामांसाठी इंटरनेटची गरज असते. त्यामुळे, डिजिटल विभाजन कमी करणे आणि सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करून देणे हे फिनलंडचे उद्दिष्ट होते. विशेषतः ग्रामीण भागात सर्वांना इंटरनेट क्सेस मिळावे यासाठी काही मुद्द्यांकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. 'भारतनेट'सारख्या प्रकल्पांद्वारे गावागावांमध्ये ऑप्टिकल फायबर केबल टाकली गेल्यास उच्च-गती इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळू शकेल. दुर्गम भागांमध्ये फोरजी आणि फाईव्हजी नेटवर्कसाठी मोबाइल टॉवर्स उभारण्याच्या योजनेमुळे डिजिटल भारत निधीसारख्या योजना मदत करू शकतात. फायबर किंवा टॉवर पोहोचवणे कठीण असणाऱ्या ठिकाणी उपग्रहाद्वारे इंटरनेट सेवा पुरवण्याची योजना आखायला हवी. याखेरीज गावांमध्ये सार्वजनिक ठिकाणी वाय-फाय हॉटस्पॉट योजना तयार करून लोकांना स्वस्त दरात इंटरनेट वापरता येईल. टेलिकॉम कंपन्यांना ग्रामीण भागासाठी परवडणाऱ्या डेटा योजना आणण्यासाठी प्रोत्साहित करणे यापुढील काळात महत्वाचे असेल. सध्या या कंपन्यांचा ग्राहक हा श्रीमंत शहरी असल्याने संतुलन साधण्यासाठी इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना ग्रामीण भागात सेवा देण्यासाठी आर्थिक मदत करणे आवश्यक आहे.

काही ठिकाणी ग्रामपंचायती किंवा काही समुदाय एकत्रितपणे स्वतःचे इंटरनेट नेटवर्क तयार करू शकतात. तसेच ग्रामीण भागातील लोकांना इंटरनेट आणि डिजिटल सेवांचा वापर कसा करायचा हे शिकवण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात. इंटरनेट आणि संबंधित सेवांची माहिती स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध करणे या दृष्टीने महत्वाचे ठरते; जेणेकरून लोकांना ते सहज समजेल. ग्रामीण भागातील वीजेची समस्या लक्षात घेता कमी ऊर्जा वापरणाऱ्या उपकरणांचा वापर, इंटरनेट पायाभूत सुविधांसाठी सौर ऊर्जा किंवा इतर नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोतांचा वापर करणेही लक्षात घ्यायला हवे. ग्रामीण भागात टॉवर उभारण्यासाठी आणि फायबर केबल्स टाकण्यासाठी लागणाऱ्या परवानग्यांची प्रक्रिया जलद आणि सुलभ करण्यालाही महत्व द्यायला हवे. त्यासाठी खासगी कंपन्यांना ग्रामीण भागात इंटरनेट सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आकर्षक योजना आखण्याची आणि प्रोत्साहन देण्याची गरज आहे. डिजिटल इंडिया मोहीम ही भारत सरकारद्वारे सुरु करण्यात आलेली एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. नागरिकांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सरकारी सेवा उपलब्ध करून देणे, देशात डिजिटल पायाभूत सुविधा विकसित करणे आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढवणे हा या योजनेमागील उद्देश आहे. यासोबतच, देशातील नागरिकांना डिजिटल साक्षर करणे आणि तंत्रज्ञानाचा वापर करून सक्षम करणे हेदेखील या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. २०२५ पर्यंत डिजिटल इंडिया मोहिमेने अनेक महत्त्वपूर्ण नियोजनांमध्ये यश मिळवले आहे.

डिजिटल इंडिया मोहिमेचे सर्वात मोठे यश म्हणजे डिजिटल पेमेंटमध्ये झालेली वाढ. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात युपीआयद्वारे होणारे व्यवहार डिसेंबर २०२४ मध्ये २३,२४,६९९.९१ कोटींवर पोहोचले आहेत, जे डिसेंबर २०१६ मध्ये केवळ ७०७.९३ कोटी होते. आता , सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स आणि मॉरिशससारख्या सात देशांमध्ये युपीआय लाईव्ह व्यवहार सुलभ करत आहे. मार्च २०२३ पर्यंत १३६.६५ कोटींहून अधिक आधार कार्ड जारी करण्यात आली आहेत. जानेवारी २०२५ मध्ये आधार फेस ऑथेंटिकेशनने शंभर कोटींचा टप्पा ओलांडला. १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत डिजिलॉकर वापरकर्त्यांची संख्या ४६.५२ कोटींवर पोहोचली आहे. जानेवारी २०२५ पर्यंत २.१४ लाख ग्रामपंचायती इंटरनेटद्वारे जोडल्या गेल्या असून ६.९२ लाख किलोमीटर ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आली आहे. दरम्यान, ग्रामपंचायतींमध्ये १.०४ लाख वाय-फाय हॉटस्पॉट स्थापित करण्यात आले आहेत. 'जेम' अर्थात गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसची वाढ: जानेवारी २०२५ पर्यंत 'जेम'ने चालू आर्थिक वर्षातल्या दहा महिन्यांमध्ये ४.०९ लाख कोटींचे सकल व्यापारी मूल्य गाठले आहे, जे मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत जवळपास ५० टक्क्यांनी अधिक आहे. याशिवाय 'उमंग' पने ७.१ कोटींहून अधिक वापरकर्त्यांना ३२ राज्यांमधील २०७७ सरकारी सेवांशी जोडले असून २३ भाषांमध्ये समर्थन पुरवले आहे. 'दिक्षा' हे जगातील सर्वात मोठे शिक्षण तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म ठरले आहे. त्यावर ५.५६ अब्जांहून अधिक शिक्षण सत्रे नोंदली गेली आहेत. शिवाय 'आयुष्मान भारत डिजिटल मिशन' अंतर्गत ६.७ कोटी आरोग्य खाते क्रमांक जारी करण्यात आले आहेत.

डिजिटल इंडियाने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यावर, सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे.

deepak@deepakshikarpur.com
(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

✦✦✦

# मतदार यादीतील विसंगतीची समस्या जुनीच

राहुल गांधी उत्साहाने भरलेले आहेत. त्यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध युद्ध पुकारले आहे. आयोगाच्या अधिकृत आकडेवारीतील निवडक मतदारांच्या तपशीलांचा हवाला देऊन त्यांनी बंगळुरू मध्य मतदारसंघात एक लाखाहून अधिक मतदार कसे गुप्तपणे जोडले गेले हे दाखवून दिले आहे. त्यांनी असा निष्कर्ष काढला की भाजपने हे स्वतःच्या फायद्यासाठी केले . आयोगावर मते चोरण्यासाठी भाजपशी संगनमत केल्याचा आरोपही केला आहे. ते असाही दावा करत आहेत की बंगळुरूमध्ये जे घडले ते भारताच्या इतर भागात मोठ्या प्रमाणात घडत आहे. लोकशाहीत यापेक्षा गंभीर आरोप क्वचितच कोणी करू शकेल.

राहुल गांधींना बंगळुरूमध्ये एकाच खोलीत ८० मतदार मिळाले असतील तर ही भारतात एक सामान्य गोष्ट आहे. पश्चिम बंगाल, मुंबई, सुरतमध्येही त्यांना एकाच खोलीत किंवा एका झोपडपट्टीत मतदारांची अशीच गर्दी दिसेल.

सत्य समजून घ्या. कारण अनेक दशकांपासून सर्व राजकीय पक्ष, त्यांचे उमेदवार संधी मिळेल तेव्हा मतदार यादीत मतदारांची नावे जोडण्याचा, वगळण्याचा आणि घटवण्याचा खेळ खेळत आहेत. आजच्या गोंधळलेल्या राजकीय वातावरणात काँग्रेस भाजपवर मत चोरीचा आरोप करत असेल तर ते समजण्यासारखे आहे.

परंतु राहुल यांनी थेट निवडणूक आयोगाविरुद्ध आंदोलन का सुरू केले आहे राहुल मतदार यादीच्या व्हिडिओ फुटेज आणि डिजिटल प्रतींची मागणी करत आहेत.

आयोगाने निर्णय आणि कायद्यांचा हवाला देत म्हटले की उमेदवारांना डिजिटल प्रती उपलब्ध करून दिल्या जातात. उमेदवाराने पुनर्विचार याचिका दाखल केली नाही तर मतदान केंद्रांचे व्हिडिओ फुटेज ४५ दिवसांसाठी ठेवले जाते.

आयोगाचे म्हणणे आहे की एक लाख मतदान केंद्रांचे म्हणजे सुमारे २७३ वर्षांचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासाठी एक लाख दिवस लागतील. कायद्यानुसार कोणत्याही पक्षाने मतदान प्रक्रियेत किंवा मतदार यादीत काही तफावत आढळल्यास निकालानंतर ४५ दिवसांच्या आत तक्रार दाखल करायला हवी.

परंतु राहुल यांनी आयोगाच्या डेटाचा अर्थ लावण्यासाठी त्यापेक्षा जास्त वेळ घेतला आहे. राहुल यांना त्यांच्या तथ्यांवर विश्वास असेल तर त्यांना नियम २० (३) (ब) नुसार संशयास्पद मतदारांविरुद्ध दावे दाखल करण्यास आणि शपथेखाली घोषणापत्रावर स्वाक्षरी करण्यास कोणतीही अडचण येऊ नये, असे आयोगाने म्हटले आहे.

राहुल यांनी ह नाकारले आहे. यावरून हे दिसून येते की ही एक राजकीय लढाई आहे. तथापि, राहुल यांनी उपस्थित केलेला मुद्दा महत्त्वाचा आहे. राहुल यांनी दशकांपासून वादग्रस्त आणि गंभीर चिंतेचा विषय मांडला आहे. निवडणुकीच्या पूर्वसंध्येला शक्तिशाली उमेदवारांचे पोलिंग एजंट" बनावट मते टाकण्याचे अनेक मार्ग शोधतात. ते मतदार यादीतील माहितीचा गैरवापर करतात. मतदानाच्या दिवसापूर्वी अनेक आठवडे ते त्यांच्या मतदारसंघातील सर्व मतदारांचा मागोवा ठेवतात.

किती जणांचा मृत्यू झाला आहे, किती जण बाहेर पडले आहेत, किती नवीन मतदार झाले इत्यादी माहिती घेतात. कोणत्याही उमेदवाराला त्यांच्या मतदारसंघाच्या मतदार यादीवर पूर्ण पकड असल्याशिवाय निवडणूक जिंकणे शक्य नाही. भारतात ९० कोटींहून अधिक मतदार आहेत. महानगरांमध्ये सुमारे ३० लाख लोकांना स्वतःचे घर किंवा पत्ता नाही. त्यांचे मतदार ओळखपत्र मिळविण्यासाठी घराचा पत्ता" वापरण्याची परवानगी देणाऱ्यांचा शोध घेतात.

देशातील बांधकाम क्षेत्रातील सुमारे एक कोटी असंघटित कामगार बांधकाम स्थळावर किंवा त्याच्या जवळ राहतात. निवडणुकीच्या वेळी ते त्यांच्याकड उपलब्ध" पत्ता वापरतात. भारतातील ४५ कोटींहून अधिक लोक स्थलांतरित आहेत. त्यांना जुन्या घराचे नाव वगळून नवीन घराचा पत्ता जोडावा लागतो. कामगारांसाठी ही प्रक्रिया कठीण आहे. उमेदवारांचे मतदान एजंट मतदारांच्या हालचालींवर लक्ष ठेवतात. हे एक कंटाळवाणे आणि महागडे काम आहे.

२००८ मध्ये मतदार यादीच्या पुनरावृत्ती दरम्यान मृत आणि डुप्लिकेट मतदारांची २१.१३ लाख मते वगळण्यात आली. त्या वर्षीच्या पुनरावृत्तीनंतर ६१.६९ लाख नावे जोडण्यात आली. ७८.०१ लाख नावे वगळण्यात आली. त्यावेळी उत्तर प्रदेशची लोकसंख्या ११ कोटी होती. ती आता २४ कोटींहून अधिक आहे. घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची पद्धत बंद करण्यात आल्यानेही ही समस्या उद्भवत आहे.

एका माजी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मते, दरवर्षी घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले नाही तर मतदार यादीत ३ ते ४% विसंगती आढळून येतात. ही एक मोठी संख्या आहे. म्हणूनच निवडणूक आयोगासाठी विशेष सघन पुनरावृत्ती अत्यंत आवश्यक झाली आहे.






# विकास तिथलं सौंदर्य संपवतोय

**अजिंक्य दंडवते**

मी उत्तराखंडच्या उत्तरकाशी मध्ये २ वर्षे राहिलो आहे. तिथे प्रचंड विकास म्हणजेच विनाश चालू आहे. मागच्या वर्षी दिवाळीत जो टनेल कोसळला होता आणि लेबर अडकले होते त्याच प्रोजेक्टवर होतो मी. असंख्य झाडं तोडली गेली आहेत. डोंगर पोखरले गेले आहेत. रस्ते बनवण्यासाठी डोंगर कापण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे दरड कोसळते आणि वरची हजारो झाडे खाली कोसळतात. एकदा दरड कोसळली की तिथली अख्खी एकोसिस्टिम बिघडून जाते. डोंगराला इतका तीव्र उतार आहे आणि त्यात डोंगर केवळ मातीचे आहेत. त्यामध्ये अजिबात पक्का खडक नाही. पाऊस आला की सगळं सेमिलिक्विड होऊन ढासळतं. मी जिथे राहत होतो तिथे एकदा असं स्लाईड झालं होतं. तीन चार दिवस बंद होता रस्ता.





कितीही प्रयत्न केला तरी हिमालयात मोठे रस्ते करता येणार नाहीत. करू नयेत. तुमचा विकास तिथलं सौंदर्य संपवतोय. नाही गेले लोक चारधाम यात्रेला तरी चालतील. पर्यटन जर निसर्गाच्या मुळावर उठणार असेल तर नको वाढायला.

तिथे प्रत्येक गाव संपलं की एक कचऱ्याचा ढीग दिसायला लागला आहे.

तो कचरा थेट गंगेत, यमुनेच्या पात्रात टाकला जातोय. पर्यटनामुळे हा कचरा खूप वाढत आहे. पर्यटक जबाबदारीने वागत नाहीत. नदीला माता मानून त्यामध्ये खुशाल प्लास्टिक टाकणारा दुटप्पी समाज आहे हा.

जंगलं अंबानीला देऊन झाड लावण्याचं आवाहन करणारं सरकार आपल्याला लाभलं आहे. अंबानीला सगळं विकून पीएम केअरच्या नावाखाली भीक मागणारा माणूस आपण डोक्यावर घेतलाय. अपेक्षा कोणाकडून ठेवणार? जनतेला प्रश्न विचारावे वाटत नाहीत. नवरा मेला तरी चालेल पण सवत रंडकी झाली पाहिजे अशा घाण मानसिकतेने समाज धर्मयुद्ध करू पाहतोय. शिकले सवरलेले कार्टे अक्कलशून्य नेत्यांच्या जीपा दिसल्या की लोंडा घोळत फिरतात. अखंड भ्रष्टाचार करूनही माणसाला पुन्हा निवडून देऊन नेता करतात.

या समाजाकडून कसल्याही अपेक्षा राहिलेल्या नाहीत. असं नेहमी वाटतं एका चांगल्या समाजाचा आपण भाग असावं. त्यासाठी हा समाज सुधारेल असं मला वाटत नाही. दुसरा एखादा देश , तिथला समाज आपल्याला चांगला, सुंदर वाटू लागला तर त्यात गैर काहीच नाही !

■ ■

# समस्या अपेक्षेप्रमाणे येत नाही...
# सुरुवात करणं महत्त्वाचं!

**सलिल सुधाकर चौधरी**
**नेटभेट ई-लर्निंग सोल्युशन्स**

ही गोष्ट आहे १८८८ सालची. जर्मनीतील एक तरुण गृहिणी, बर्था, आपल्या पतीबद्दल काळजीत होती. तिने कार्ल नावाच्या एका हुशार संशोधकाशी लग्न केलं होतं, कारण तिला त्याच्या प्रतिभेवर प्रचंड विश्वास होता. लग्नामध्ये तिने माहेरून मोठी रक्कम आणली होती, ज्यातून कार्लने त्याच्या सर्वात मोठ्या शोधासाठी, 'मोटरवॅगन'साठी पैसा गुंतवला होता. ही मोटरवॅगन म्हणजे जगातील पहिल्या इंजिन (internal-combustion engine) असलेल्या तीन चाकी गाडीचा एक नमुना होता.

बर्थाचा पतीवरील विश्वास बरोबर होता, कार्ल खरंच एक हुशार संशोधक होता. पण त्याची एक मोठी अडचण होती - त्याला आपल्या कामाचं मार्केटिंग अजिबात जमत नव्हतं. त्याने एकही गाडी विकली नव्हती. लोक त्याच्या 'मोटरवॅगन'कडे फक्त एक खेळणं किंवा कुतूहलाची वस्तू म्हणून पाहत होते. या गाडीचं मार्केटिंग कसं करावं, हे कार्लला कळतच नव्हतं. तो फक्त आपल्या गाडीचं डिझाईन अधिकाधिक सुधारण्यात वेळ घालवत असे. पण बर्था अधिक व्यवहारी होती. तिला माहित होतं की लोकांना फक्त बोलून पटणार नाही, तर त्यांना पुरावा हवा होता. 'मोटरवॅगन' हे फक्त एक खेळणं नसून, ते घोडागाडीसारखं सर्व काम करू शकते, हे सिद्ध करण्याची गरज होती.

एके दिवशी सकाळी, तिने कार्लसाठी एक चिठ्ठी लिहिली. त्यात लिहिलं होतं की, मी आपल्या १३ आणि १५ वर्षांच्या दोन्ही मुलांना घेऊन माझ्या आईकडे जात आहे. तिची आई १०० किलोमीटर दूर राहत होती. त्यामुळे कार्लला वाटलं की ती ट्रेननेच जाईल. पण जेव्हा त्याने गॅरेजचा दरवाजा उघडला, तेव्हा त्याच्या काळजात धस्स झालं.

त्याची 'मोटरवॅगन' गायब होती! त्याला विश्वासच बसेना. 'ती गाडी घेऊन तर नाही ना गेली?'

तो स्वतःशीच पुटपुटला. त्या गाडीत फक्त दहा मैल (अंदाजे १६ किमी) चालेल एवढंच इंधन होतं आणि वाटेत इंधन भरण्यासाठी कोणतीही जागा नव्हती. शिवाय, पक्के रस्ते नव्हतेच, फक्त खडबडीत आणि खाचखळग्यांच्या पायवाटा होत्या. त्या रस्त्यांवर त्याच्या 'मोटरवॅगन'चे तुकडे तुकडे झाले असते. हे निव्वळ वेडेपणाचं धाडस होतं.

पण बर्थाने ते धाडस केलं होतं. तिने प्रवासात येणाऱ्या अडचणींचा कोणताही विचार केला नव्हता. तिने ठरवलं होतं की समस्या जशा येतील, तशा त्या सोडवायच्या. पहिली समस्या लगेचच समोर आली, गाडीतलं पेट्रोल संपलं. बर्थाला माहित होतं की 'लिग्रोइन' (Ligroin) नावाचं पेट्रोल-आधारित द्रावक (solvent) अनेक औषधांच्या दुकानात मिळतं. तिने एका छोट्या गावात औषधांचं दुकान शोधलं आणि तिथे एक-एक लीटरच्या दहा बाटल्या विकत घेतल्या.

(आणि अशाप्रकारे, तिने नकळतपणे जगातल्या पहिल्या 'पेट्रोल पंप'ची कल्पना प्रत्यक्षात आणली होती.)

थोड्या वेळाने, दोन तारा एकमेकांना चिकटल्या आणि गाडीची इलेक्ट्रिकल सिस्टीम बंद पडली. बर्थाने त्या तारांना वेगळं करण्यासाठी 'गार्टर' (garter - एक कपडा) वापरला आणि तारांना एकमेकांपासून दूर ठेवलं. (आणि अशाप्रकारे, तिने 'इन्सुलेशन'च्या प्राथमिक स्वरूपाचा शोध लावला होता.)

पुढे गेल्यावर, कार्बोरेटरमध्ये कचरा अडकला आणि गाडी बंद पडली. फुंकर मारूनही तो कचरा निघेना. तेव्हा बर्थाने आपल्या हॅटला लावलेली लांब 'पिन' (tpin) काढली आणि तिने कार्बोरेटर साफ केला. (आणि अशाप्रकारे, तिने एका अर्थाने 'रोडसाईड असिस्टन्स'ची सुरुवात केली होती.)

प्रवासात गाडीचे लाकडी ब्रेक-ब्लॉक घासून घासून गुळगुळीत झाले होते. ब्रेक लागेनासे झाले. तिने एका गावातल्या चांभाराला शोधून काढलं आणि त्याला त्या लाकडी ब्लॉक्सच्या आकाराचे दोन चामड्याचे तळवे बनवायला सांगितले. (आणि अशाप्रकारे, तिने आजच्या 'ब्रेक-पॅड'ची कल्पना जन्माला घातली होती.)

अखेरीस, एक उंच डोंगर आला, जो गाडीचं लहान इंजिन चढू शकत नव्हतं. गाडीत फक्त दोनच गिअर होते, कारण ती फक्त सपाट जमिनीवर चालवण्यासाठी बनवली होती. बर्थाने आणि तिच्या दोन्ही मुलांनी गाडीला धक्का मारत डोंगर चढवला. तेव्हा तिला कळलं की डोंगर चढण्यासाठी गाडीला कमी ताकदीचा 'लोअर गिअर' असणं गरजेचं आहे. अखेरीस, अनेक अडचणींवर मात करत ती तिच्या आईच्या घरी पोहोचली.

तिने लगेच आपल्या पतीला तार करून आपण सुरक्षित पोहोचल्याचं कळवलं. दुसऱ्या दिवशी, ती त्याच गाडीने १०० किलोमीटरचा परतीचा प्रवास करून घरी परत आली.

तिने दोन दिवसांत २०० किलोमीटरचा प्रवास करून हे सिद्ध केलं होतं की, तिच्या पतीची 'मोटरवॅगन' घोडागाडीपेक्षा कमी नाही. तिच्या या धाडसी प्रवासाची बातमी संपूर्ण जर्मनीत वाऱ्यासारखी पसरली. लोकांचा 'मोटरवॅगन'कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि कार्लच्या कंपनीला प्रचंड यश मिळालं.

बर्थाचं माहेरचं आडनाव 'रिंगर' होतं, पण तिचं सासरचं आडनाव होतं 'बेंझ' आणि तिच्या पतीचं नाव होतं 'कार्ल बेंझ'. बेंझ कंपनी यशस्वी झाली. कालांतराने १९२६ मध्ये तिचं 'डेमलर' (Daimler) कंपनीत विलीनीकरण झालं आणि जगातली सर्वात प्रसिद्ध कंपनी 'मर्सिडीज-बेंझ' (Mercedes-Benz) उदयास आली.

बर्था बेंझच्या या गोष्टीतून आपण काय शिकू शकतो? आपण हे शिकू शकतो की, सर्व काही योग्य होण्याची वाट पाहत बसल्याने समस्या कधीच सुटत नाहीत.

आपल्याकडे उत्तरं नसली तरीही सुरुवात करणं महत्त्वाचं आहे, कारण समस्या कधीच आपल्या अपेक्षेप्रमाणे येत नाहीत.

आपण विचार करत बसलो, तर संधी हातातून निघून जाऊ शकते. Netbhet प्रसिद्ध लेखक जेम्स क्लिअर यांनी एकदा एक किस्सा सांगितला होता. ते काही वरिष्ठ मॅनेजमेंट अधिकारी आणि सल्लागारांसोबत एका चर्चेत सहभागी होते.

एका नाविन्यपूर्ण कल्पनेबाबत चर्चा सुरु होती. अनेक तांत्रिक आणि व्यवस्थापकीय मुद्दे अनेकजण मांडत होते. त्या चर्चेत सहभागी असलेल्यांपैकी सगळ्यात यशस्वी, प्रसिद्ध आणि श्रीमंत व्यक्ती मात्र एकच गोष्ट बोलली...की हे आधी करून बघूया...नंतर सुधारणा करत करत पुढे जाऊया ! ती व्यक्ती होती वर्जिन ग्रुपचे सर रिचर्ड ब्रॅन्सन ! बर्था बेंझने १८८८ मध्ये हेच केलं होतं.

Just Do it, then fix it !

## अज्ञाताकडे?

**व्यक्ति जन्माला येते**
**येते कुठून ?**
**मृत्यू नंतर जाते**
**जाते कुठे ?**

**सर्वकाही अज्ञात**
**अनाकलनिय,**
**तर्काच्या पलीकडे !**

**अज्ञाताकडून-अज्ञाताकडे**
**मधला प्रवास म्हणजे**
**मानवी जीवन ङ्क.!**

**नरक - स्वर्ग**
**पाप पुण्य ।**
**सत्य की असत्य**
**वास्तव की भ्रामक ?**

**अज्ञात -ज्ञात - अज्ञात**
**एक आवर्तन पूर्ण होते ।**
**कायमचे की**
**पुन्हा सुरु होते ?**

**प्रश्नच प्रश्न कारण**
**अज्ञाताकडे गेलेला**
**परतलाच नाही**
**अद्याप पर्यंत ङ्क. !**
**नाही तर,**
**तिढा सुटला असता**
**नाही कां ?**

**प्रा.अशोक श्री. सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# दही हंडीचा खरा अर्थ




कृष्णकन्हैया म्हटले की आपल्याला आठवते ती त्याची दहीहंडी! पण त्याचे पाश्वभूमींवर आपण कधीही लक्ष देत नाही. नक्की काय होती ही दहीहंडी? काय आहे त्याच्या काल्याचा अर्थ? कशासाठी होता त्या गोविंदांचा मानवी मनोरा बनविण्या मागील गर्भितार्थ? आपण जर त्यावर भगवान श्रीकृष्णांच्या अवतारी व्यक्तिमत्वाचा विचार केल्यास आपल्याला काय आढळते?

याची उत्तरे आपल्याला अशी आढळतात की, मथुरेचा हुकूमशाहा बनलेल्या कंस नावाच्या अत्याचारी राजाने त्याच्या आधीन असलेल्या गोकुळ नावाच्या छोट्या ग्रामवासीयांवर एक अतिशय असहनीय व अव्यवहार्य दंडक लादला होता, की रोज गोकुळातील समस्त गोमातांनी दिलेल्या संपूर्ण दुधाचे, दुग्धजन्य दही, लोणी, वगैरे पदार्थांवर सम्राटकंसाचा अधिकार असून, उत्पादन झाल्या बरोबर, ती मथुरेत त्याच्या राजधानीत पोहोचविणे अनिवार्य आहे.

या अन्याय दंडकाच्या विरोधात जाण्याची हिम्मत गोकुळाधिपती नंदराजातही नव्हती . गोकुळ हे एक ग्राम होते. तेथे आठरापगड जातींचे लोक राहत होते. यात,यादव कुलोत्पन्न क्षत्रिय स्वयं श्रीकृष्ण, ब्राह्मण सुदामा, वैश्य पेंद्या व इतर सर्व जाती जमातीचे गोपाल, (गोमातेचे पालन करणारे) होते.

या परिस्थितीत सम्राटकंसाच्या विरोधात समस्त गोकुळवासीयांना जागृत करणे बाल श्रीकृष्णाच्या आवाक्यात नव्हते. कारण एव्हढ्याश्या बालकावर कोण विश्वास ठेवणार?

मग भगवान बालकृष्णान्नी एक उपाय केला. गोकुळातील ग्रामस्थ,बालके, गोमातेची वासरे यांना त्यांचा नैसर्गिक अधिकार व न्याय मिळवून देण्या करिता (नॅच्युरल जस्टीस) एक लीला सुरू केली. नैसर्गिक अधिकार व न्यायनुसार गोमातेच्या दुधावर पहिला नैसर्गिक अधिकार हा वासरांचा असतो. म्हणून भगवान बालकृष्णान्नी पहाटेच सर्व वासरांच्या गळ्यातील खुंट्याला बांधलेले दावे (बांधलेले दोर), सोडून देणे सुरू केले. म्हणजे सकाळी गोदोहन करण्यास आलेल्या ग्रामस्थांना, वासरांनी पोटभर प्याल्याने कमी दूध मिळू लागले.



**डॉ. अविनाश प. परांजपे**
**वानाडोंगरी, हिंगणारोड ,**
**नागपूर .**

त्यानंतरचा दुग्धजन्य दही, लोणी, वगैरे पदार्थांवर पहिला नैसर्गिक हक्क हा घर, ग्रामातील बालकांचा असतो. या न्यायाने भगवान बालकृष्णान्नी घरोघरी जाऊन आपल्या सवंगड्यांच्या सावेत दही व लोणी फस्त करण्याचा सपाटा लावला. परिणामी सम्राटकंसाला कमी दूध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा होऊ लागला. कंसाने त्यावर उपाय म्हणून समस्त ग्रामस्थांना, बालकांच्या हस्त पोहोच पासून उंचीवर हंडी टांगून ठेवण्याची आज्ञा केली. ग्रामस्थांनी तसे करणे सुरू केले.

परिणामी, भगवान बालकृष्णान्नी आपल्या समस्त गोपाल सवंगडयांना एकीचे बळ, योग्य साध्य प्राप्तीसाठी विना भेदाभेद संघटन शक्तीचा प्रयोग यावर समजावून, मानवी मनोरे बनविण्याची शक्कल काढली. त्यासाठी शंकू सादृश्य मानवी स्तरावर स्तर चढवून त्या हंडीस प्राप्त करू शकतो हे दाखवून दिले. या द्वारे सर्व समाजात एकीचे बळ व विना भेदाभेद संघटन शक्तीचा, एकात्मतेचा संदेश प्रसारीत केला.

सबळ व्यक्तींनी सुरवातीला पायाभूत गोलाकार चक्र बनवून त्याचेवर क्रमाक्रमाने कमी बलिष्ठ व्यक्तींनी शंकू समान लहान लहान होत जाणारे गोलाकार चक्रांचे स्तरांवर स्तर बनवून उच्च अंतरावरील हंडी पर्यन्त मनोरा रचून आपल्यास आवश्यक दही, लोणी, दूध, वगैरे साध्य करायचे. या द्वारे समाजातील शक्तिमान व्यक्तींच्या पासून अगदी कमी बळ असलेल्याचा सहभाग घेऊन त्यांस श्रेयस व प्रेयस लक्ष्य साध्य करता येते, हा धडा घालून दिला.

भगवान बालकृष्णान्नी दिलेला हाच संदेश एका दही हंडी नावाच्या परंपरेने आजपर्यंत सुरू आहे, फक्त त्यात मौज, मस्ती, ताकदीचे प्रयोग असे स्वरूप प्राप्त झालेले आहे. मूळ विना भेदाभेद संघटन शक्तीचा, एकात्मतेचा संदेश, मात्र विसरल्या सारखा झालाय.

जेव्हा आपणास साध्य झालेले श्रेयस व प्रेयस प्राप्त होते , त्यानंतर त्याचे समान वाटप केले जावे. याच उद्देशाने गोपाळकाला भगवंताने सुरू केला. विना भेदाभेद संघटन शक्तीचा, एकात्मतेचा संदेश प्रसारीतकरण्यासाठी, बाळकृष्णाने प्रत्येक सवंगड्याला, आपआपल्या घरून आप आपली शिदोरी संगे आणावी असे सॅंगितले. सर्व थरातील सवंगड्यांनी आप आपल्या ऐपती प्रमाणे आणलेली शिदोरी एकत्र करून त्याचा काला तयार करून समस्त सवंगड्यांनी वाटून घेत आनंदाने ग्रहण केला पाहिजे हा संस्कार दिला.

श्रीमंताच्या कडचे गोडधोड असो किंवा गरिबा घरची चटणी भाकरी, किंवा मध्यम घरची भाजीपोळी सगळे जिन्नस एकत्र करून समस्त सवंगड्यांनी वाटून खावे हा प्रघात पाडला. त्या काल्याचा प्रथम घास स्वतः खात, थोडक्यात मित्र मंडळींनी एकमेकांची सुखदुःखे वाटून घ्यावीत असा बहुमोल संदेश दिला. उच्च, निच्च, मोठा, लहान, श्रेष्ठ, कनिष्ठ, असे भगवंता पुढे समान असतात, समाजाने देखील एकमेकात असला भेदाभेद पाळू नयेत असे सांगून त्याची सुरवात स्वतः पासून केली. मित्रांनो चला, आपण ही हा धडा शिकूयात!

■ ■ ■ ■

## शोध माणुसकीचा

**दिसेंदिवस माणुसकी**
**हरवत चालली आहे**
**माणुसकीला शोधू कुठं**

**आपलेच आपल्यापासून**
**दुरावत चालले आहे**
**परक्यानकडून आशा**
**ठेवू कुठं**

**नात्यातल प्रेम कमकुवत**
**होत चाललं आहे**
**नात्यात विश्वास आणायचं कसं**
**माणूस माणसापासून दुरावत आहे**
**माणसाला पकडून ठेवू कसं**

**दुनियेच्या गर्दीत माणूस**
**एकमेकला फसवत आहे**
**या फसवणुकीला**
**अडवू कुठं**
**माणसातल्या माणूसकीला**
**शोधू कुठं**

**दिखाव्याच्या होडमध्ये माणूस**
**वाईट मार्गावर जात आहे**
**मारहाण, अपहरण सारखे गुन्हे**
**त्या मुळेच वाढत आहे**

**दिवसेंदिवस माणुसकी**
**हरवत चालली आहे**
**माणुसकीला शोधू कुठं**
**कळत नाही आहे**

**करिश्मा नरेंद्र मल**
**गडचिरोली**
**8605112646**

## महत्त्वाचे

### येवला तालुक्यातील मोठी कारवाई; २० किलो गांजा जप्त

**येवला ।** तालुका पोलिसांनी 'अंमली पदार्थ विरोधी अभियान २०२५' अंतर्गत मोठी धडक कारवाई करत तब्बल २० किलो गांजा जप्त केला आहे. नाशिक ग्रामीण पोलिस दलाच्या या विशेष मोहिमेत पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या आदेशानुसार व अप्पर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंग संधू, उपविभागीय पोलिस अधिकारी बाजीराव महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, १२ ऑगस्ट रोजी अंदरसुल गावातील कहार वस्तीच्या पाठीमागे मोठ्या प्रमाणावर गांजाची आयात झाल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक संदीप मंडलिक, उपनिरीक्षक हर्षवर्धन बहिर, सपोउनि दौलत ठोंबरे, पोहवा राजेंद्र पाटील, पोशि योगेश मोरे, गणेश सोनवणे, नितीन पानसरे, गजानन दळवे, रवींद्र दराडे आणि दीपक जगताप यांच्या पथकाने शिताफीने छापा टाकला. या कारवाईत ४ लाख रुपये किमतीचा २० किलो गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपी सुनील रघुनाथ कचरे, गणेश सुनील कचरे (वय १७) आणि किशोर कल्याण लाकारे, तिघे राहणार अंदरसुल, यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्यावर एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि येवला तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

### माजी सैनिक भाऊराव सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

**नाशिक ।** आजादी का अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियानाच्या पार्श्वभूमीवर महिरावणी येथील मातोश्री गी. दे. पाटील माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. १३)



ध्वजारोहणाचा सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे ध्वजारोहण निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र व भारतीय सैन्यात २४ वर्षे सेवेत राहिलेले माजी सैनिक भाऊराव सोनवणे यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक भदाणे होते. यावेळी माजी सैनिक भाऊराव सोनवणे यांनी चोवीस वर्षाच्या सेवेतील आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना देशप्रेम, शिस्त आणि जबाबदारी या विषयांवर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या भाषणातून देशसेवेची प्रेरणा मिळाल्याने विद्यार्थी उत्साही झाले. कार्यक्रमात कुमारी शर्वरी वाघ या विद्यार्थिनीने देशभक्तीपर गीत सुंदर आवाजात सादर करून वातावरण देशभक्तीने भारून टाकले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच कचरू वागळे,सदस्य सिताराम वागळे, सदस्य राजाराम लहांगे उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक बाळासाहेब सोनवणे तर सूत्रसंचालन सुरेखा आहेर यांनी केले.आभार समाधान शेवाळे यांनी मानले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक संजय पवार, देवेंद्र देवरे, संजय गायकवाड, दीपाली वाडीले, अश्विनी चौरे,अतुल कुलथे, दिलीप खांडबहाले, विलास येवले आदिंसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

### १५ महिन्यांनंतर अपहृत मुलगा सुरतमध्ये सापडला

**नाशिक ।** वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक कक्षाने अत्यंत गुप्त तपासातून १५ महिन्यांपासून बेपत्ता असलेला मुलगा गुजरातमधील सुरत येथून



शोधून काढत नाशिकमध्ये परत आणला. आडगाव पोलीस ठाणे हद्दीतील हा मुलगा अचानक बेपत्ता झाला होता. त्याच्या अपहरणप्रकरणी तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे सतत तपास सुरू ठेवला होता. अखेर सुरत शहरातील लाल दरवाजा परिसरात तो असल्याची ठोस माहिती मिळताच पोलिसांनी शोध पथक तयार केले. पथकाने गुजरातमध्ये धाड टाकून मुलाला शोधून सुरक्षित ताब्यात घेतले आणि पुढील कारवाईसाठी आडगाव पोलिसांकडे सोपविले. ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल, सपोनि. विश्वास चव्हाणके, सपोनि. प्रविण माळी, पोउनि. बाळु गिते, पोहवा गणेश वाघ, मपोअं वैशाली घरटे, पोअं अतुल पाटील, प्रजित ठाकुर व पोहवा दिपक पाटील यांनी संयुक्तरीत्या सहभाग नोंदवला. गुन्हे शाखेच्या कारवाईमुळे दीर्घकाळ अपहृत मुलाला परत मिळाल्याने कुटुंबीयांना दिलासा मिळाला.

# स्वातंत्र्याचा पूर्वसंध्येला गडावरील पत्रकाराला ध्वजारोहणाची संधी

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत-हर घर तिरंगा २०२५ अभियान



**सप्तश्रृंग गड ।** प.पू.ओम दत्त श्री ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालय श्री सप्तश्रृंगी गड येथे ध्वजारोहणाच्या पूर्वसंध्येला श्री सप्तश्रृंगी गड येथील प्रतिनिधी पत्रकार अमृत पवार यांच्या हस्ते गडावरील पत्रकारांचा सन्मान म्हणून सकाळी ७.३० वाजता ध्वजारोहण करण्यात आले.

> भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त माध्यमिक विद्यालय सप्तशृंगगड येथे ध्वजारोहण सोहळ्यास उपस्थित राहण्याची संधी व एका सामान्य माणसाला ध्वज फडकविण्याचा मान मिळाला, ही माझ्यासाठी मोठी अभिमानाची बाब आहे. – **स्थानिक प्रतिनिधी**

ध्वजपूजनाचा मान प्रतिक्षा सावंत या विद्यार्थिनीने घेतला. मुख्याध्यापक शशिकांत देसले म्हणाले आजच्या या पवित्र आणि अभिमान प्रसंगी, आम्हाला अतिशय आनंद होत आहे की, आपल्या श्री सप्तश्रृंगी गड परिसरातील सत्य, प्रामाणिकपणा आणि निस्वार्थ सेवाभावी प्रतीक असलेल्या, आदर्श पत्रकारांचा सन्मान करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. जनतेसाठी न थकता काम करत समाजातील घडामोडींचे सत्य स्वरूप लोकांपर्यंत पोहोचविणारे हे कार्य अत्यंत जबाबदारीचे आहे. अशा या सामाजिक जागृतीच्या चौथ्या दीपस्तंभाने त्यांच्या हस्ते आपल्या शाळेचे ध्वजारोहण होणे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. याप्रसंगी "हर घर तिरंगा" प्रचार प्रसिद्धीसाठी देशभक्तीपर गीतांवर कवायत करण्यात आली. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, डॉ. महेश पालकर यांच्या सूचनेने गोकुळ अष्टमीस संतश्रेष्ठ श्री ज्ञानदेवांची ७५० वी जयंती असल्याने त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विद्यार्थ्यांनी श्री सप्तश्रृंगी गड परिसराच्या कल्याणासाठी पसायदान म्हटले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सतिष बोरसे,सिमा गांगुर्डे, प्रतिभा बोरस्ते, आकाश सोनवणे, अरविंद पवार, कैलास गवळी, वसतिगृह अधीक्षक गोरख भोये, यांनी परिश्रम घेतले.-या संपूर्ण कार्यक्रमाचे व्हिडिओ व फोटोग्राफी निखिल पाटील यांनी केली. संचालन व नियोजन संजय ठोके यांनी केले.

## सागरमल मोदी शाळेत विद्यार्थ्यांनी साकारले श्रीगणेश



**नाशिक ।** नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर, शालिमार येथील शाळेत शाडू मातीपासून गणपती बनवणे कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत कलाशिक्षिका रेखा जंत्रे, दक्षता देसाई व स्मिता दळवी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत इ 3 री व 4 थी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. व बाप्पा बनवण्याचा सर्व विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. तसेच शाळेत इयता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी क्लेपासून गणपती बाप्पा साकारले. अशा विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी शाळेत आनंद लुटला. सदर उपक्रमासाठी मुख्याध्यापक राजेंद्र निकम, विभागप्रमुख अशोक शिरूडे, मनिषा जोशी, अश्विनी पगार, प्राजक्ता क्षीरसागर, क्रांती बोराटे, मनीषा कापसे, निलिमा गायधनी, किशोरी शुक्ल, उषा जोपळे, प्रशांत केंदळे, हर्षल कोठावदे, निलेश चव्हाण, प्रतिभा बाविस्कर, तेजश्री बुवा सारिका सूर्यवंशी, राहूल चव्हाण, दिपाली पाटील या सहकारी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेत उत्कृष्ट गणेश मूर्ती साकारणाऱ्यात प्रथम क्रमांक तनिष्का उमेश कुलकर्णी (इयत्ता तिसरी), द्वितीय क्रमांक स्वराज रघुनाथ सोनवणे ( इयत्ता चौथी), तृतीय क्रमांक दर्शन नामदेव भोये (इयत्ता तिसरी) मिळाला. वरील विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक निकम सर यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

## नाशिकचा शाश्वत विकासही सर्वांची जबाबदारी : गुरसळ

**नाशिक ।** समृद्ध नाशिक शहराला पौराणिक, ऐतिहासिक वारसा असून निसर्गाचे वरदान लाभले आहे. सुवर्ण त्रिकोणातील नाशिक हा महत्त्वाचा कोन देशासह परदेशाचे देखील आकर्षण ठरला आहे. जे उत्तम मिळाले आहे ते उत्कृष्ट करण्याची जबाबदारी सर्वांचीच असून प्रत्येकाने ती स्वीकारुन आपले योगदान द्यावे. एनएमआरडीए आयुक्त डॉ. माणिक गुरसळ यांनी असे प्रतिपादन केले.

क्रेडाई आयोजित प्रॉपर्टी एक्स्पो प्रदर्शनात ठक्कर्स डोम येथे ' द ग्रीन कुंभ संकल्प २५' या चर्चासत्राचे आयोजन भारतातील ५ महत्वाच्या संस्थांनी केले आहे. त्यांचे प्रमुख आयजीबीसी नाशिक चॅप्टर अध्यक्ष व कार्यक्रम संयोजक किरण चव्हाण यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. ते म्हणाले, निसर्ग, पर्यावरण यांचे रक्षण करुन सिंहस्थ कुंभमेळ्यात विकास साधायचा संकल्प आहे. यावेळी व्यासपीठावर आयपीए नाशिक चॅप्टर अध्यक्ष विक्रम खैरनार, इश्रे नाशिक चॅप्टरचे अध्यक्ष वरुण तिवारी, एफएसएआय नाशिक चॅप्टर अध्यक्ष हर्षद भामरे, क्रेडाई नाशिक मेट्रो अध्यक्ष गौरव ठक्कर उपस्थित होते. दि. १५ रोजी स्मार्ट सिटी, स्मार्ट कुंभ या विषयावर प्रमुख पाहुणे एनएमआरडीए आयुक्त डॉ. माणिक गुरसळ यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, नाशिकला निसर्गाने भरभरून

### तीन दिवसीय 'द ग्रीन कुंभ संकल्प २५' चर्चासत्र




दिले आहे. विकासाच्या नावाखाली त्याची हानी होणार नाही याची दक्षता बांधकाम क्षेत्राने अधिक सजगपणे घ्यावी. विद्यार्थ्यांच्या मनात जीवनमूल्ये बिंबवली पाहिजेत. सिंहस्थ कुंभमेळ्यात नाशिकमधून कोणताही विपरीत संदेश जाऊ नये यासाठी आतापासूनच दक्षता घेतली पाहिजे याकडे त्यांनी लक्ष वेधले.

आयपीपीचे राष्ट्रीय अध्यक्ष गुरमित सिंग अरोरा यांनी उज्ज्वल भविष्यासाठी हरित जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, पंचमहाभूते हेच देव असून त्यांचे पूजन म्हणजेच रक्षण करणे हे प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे. यावेळी डॉ.अंशुल गुजराथी, स्मार्ट सिटीचे अधिकारी सुमंत मोरे, क्रेडाई मेट्रो अध्यक्ष गौरव ठक्कर चर्चासत्रात सहभागी झाले. प्रा. डॉ.सुनील कुटे समन्वयक होते. योगिता वाजे यांनी सूत्रसंचालन केले. काल शनिवारी दि.१६ रोजी शाश्वत शहर, शाश्वत कुंभ या विषयावर पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंग यांनी मार्गदर्शन केले. सर्वांचे स्वागत वरुण तिवारी यांनी सन्मानचिन्ह देऊन केले. यावेळी झालेल्या चर्चासत्रात राकेश भाटिया, ज्येष्ठ बांधकाम व्यावसायिक जितूभाई ठक्कर, वास्तुविशारद संजय पाटील सहभागी झाले. डॉ.पूर्वा केसकर यांनी समन्वय साधला. उद्या सोमवारी दि. १८ रोजी कुंभमेळ्याचे पर्यावरणपूरक नियोजन या विषयावर या क्षेत्रातील तज्ज्ञ अजित गोखले मार्गदर्शन करणार आहेत. निसर्गरक्षण - स्वच्छ हवा, पाणी व मातीसाठी अल्पदरात उपाययोजना या विषयी माहिती देण्यात येणार आहे. बांधकाम क्षेत्रात पर्यावरण रक्षण या विषयावर ममता रावत मार्गदर्शन करतील. यावेळी होणाऱ्या चर्चासत्रात क्रेडाई मेट्रोचे माजी अध्यक्ष कृणाल पाटील सहभागी होणार आहेत. वास्तुविशारद प्राचार्या प्राजक्ता बस्ते समन्वयक असतील. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयपीए माजी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष मिलिंद शेटे यांच्यासह अनिता बोराडे, राज हिरे, अनिल आरगडे, आनंद दीक्षित, सुनील कोतवाल, अनिकेत चौधरी, तेज टाकळे, शामकुमार साबळे, निरंजन शाह विशेष परिश्रम घेत आहेत.

## 'ना नफा, ना तोटा' तत्वावर गणेश मूर्ती विक्री केंद्र सुरू

**नाशिक ।** सणासुदीच्या काळात नागरिकांची आर्थिक बचत व्हावी या दृष्टीने राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष अंबादास खैरे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी युवक काँग्रेस व मदत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील ज्येष्ठ नागरिक व त्रिमूर्ती नगर कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते "ना नफा, ना तोटा" गणेश मूर्ती विक्री केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.

गणेशोत्सवा निमित्त नागरिकांसाठी ना नफा, ना तोटा या तत्त्वावर गणेश मूर्ती विक्री केंद्राचा शुभारंभ त्रिमूर्ती नगर, हिरावाडी रोड येथे परिसरातील ज्येष्ठ नागरिक व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. राष्ट्रवादी युवक काँग्रेस व मदत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम दरवर्षी राबविला जात असून, यंदाचे हे ६ वे वर्ष आहे. गेल्या अनेक वर्षापासून युवक राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांच्या वतीने परिसरात अनेक सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. पारंपारिक सण साजरे करत असतांना बचत व्हावी. या

### रायुका व मदत फाउंडेशनचा उपक्रम

उद्देशाने हा उपक्रम राबविला जातो. तरी




जास्तीत जास्त नागरिकांनी याचा फायदा घेऊन अधिक माहितीसाठी सागर तांबे यांच्या सोबत संपर्क करावा असे आवाहन अंबादास खैरे यांनी केले.

यावेळी दिनकर लोहकरे, अरविंद सोनवणे, बाबुभाई पटेल, शैलेश शिवणकर, मनोहर आव्हाड, विजय घुगे, उदय सराफ, संदीप गांगुर्डे, संदीप खैरे, अशोक पाटील, राम शिंदे,राज रंधवा, रोहित जाधव, विनायक जाधव, प्रकाश आव्हाड यांच्या समवेत परिसरातील नागरिक व त्रिमूर्ती नगर सांस्कृतिक कला व क्रीडा मित्र मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## 'केबीटी'मध्ये महिलांना आरोग्य, स्वसंरक्षणाचे धडे..!

**नाशिक ।** महिलांचे आरोग्य, हक्क, कायदेशीर साक्षरता आणि सुरक्षितता याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने मविप्रच्या गंगापूर रोड येथील केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सबलीकरण व सक्षमीकरण' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख वक्त्या डॉ. नीता गावले व ॲड. ज्योती गांगुर्डे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी पुणे विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. एकूण तीन सत्रात ही कार्यशाळा पार पडली. यात प्रथम सत्रात नाशिक येथील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. नीता गावले यांनी महिलांच्या शारीरिक समस्या व त्याबाबतीत असलेले स्वास्थ्य यावर मार्गदर्शन केले. महिलांमध्ये प्रामुख्याने आढळल्या जाणाऱ्या पीसीओएस बाबतीतल्या समस्या, सर्व्हायकल कॅन्सर, महिलांच्या मासिक पाळीबाबत घेण्याची स्वच्छतेची काळजी तसेच या सर्व बाबतीत होणाऱ्या समस्या यावर



उपस्थितांशी प्रदीर्घ संवाद साधला. या सर्व समस्यांचे निराकरण करून एक निरोगी जीवनप्रणाली स्वीकारून समस्यामुक्त जीवन कसे जगावे, याबाबत परिपूर्ण असे मार्गदर्शन त्यांनी केले.

दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात ॲड. ज्योती गांगुर्डे यांनी विद्यार्थिनींना संविधानाचे महत्त्व, महिलांचे मूलभूत हक्क, अधिकार याबाबतीत सविस्तर असे विवेचन करून महिलांनी स्वसंरक्षणासाठी काय केले पाहिजे, याबाबतचे मार्गदर्शन उपस्थित महिला व विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक रूपाने पटवून दिले. स्वसंरक्षणासाठी महिलांच्या सेल्फ बाउंड्रीज किंवा मर्यादा कशा असाव्यात किंवा त्या असणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी पटवून दिले. निर्भयकन्या, झिरो फियर, सायबर फ्रॉड, ४२० फ्रॉड याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा विद्यार्थिनी व महिला वर्गासाठी स्वास्थ, कायदे व संरक्षण याबाबतीतले ज्ञान मिळवण्यासाठी एक उत्कृष्ट असे व्यासपीठ ठरली. कार्यशाळेसाठी विद्यार्थिनी व महिला शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. राष्ट्रगीताने या कार्यशाळेची सांगता झाली. महिला रिॲड्रेसेल विभागाच्या समन्वयक प्रा. वैशाली तिडके यांनी आभार मानले. संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मविप्र पदाधिकारी, सर्व तालुका संचालक, शिक्षणाधिकारी डॉ.डी. डी. लोखंडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. देवणे, उपप्राचार्य प्रा.सुदर्शन कोकाटे, रजिस्ट्रार सृष्टी शिंदे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## मालेगाव स्टॅन्ड मित्र मंडळातर्फे यावर्षी 'गंगा अवतरण'चा देखावा

**नाशिक ।** मालेगाव स्टॅन्ड मित्र मंडळाची स्थापना १९८० ते ८५ च्या दरम्यान झालेली असून ४५ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या या मंडळाच्या वतीने गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. दरवर्षीचे भव्य पौराणिक देखावे गणेश भक्तांचे आकर्षण ठरत आहेत. मंडळाच्यावतीने यावर्षी देखिल गंगा अवतरणाचा देखावा सादर केला जाणार आहे. याआधी मंडळाच्यावतीने दत्त जन्म, लंका दहन, संत गोरा कुंभार आदी देखावे सादर केले आहेत.

भागीरथाच्या तपस्येमुळे गंगा पृथ्वीवर आली त्याची कथा असलेला हा देखावा असून पौराणिक कथेनुसार, महाराज सगर यांचे साठ हजार पुत्र होते. एकदा, त्यांनी एक मोठा यज्ञ केला. त्या यज्ञाच्या घोड्याची चोरी झाली. इंद्राने ती चोरी केली होती. घोड्याचा शोध घेण्यासाठी सगर राजाने आपले साठ हजार पुत्र पाठवले. त्यांनी खूप शोध घेतला, पण त्यांना घोडा काही मिळाला नाही. शोधता शोधता ते पाताळलोकात पोहोचले. तिथे त्यांना तो घोडा कपिल



मामा राजवाडे    विशाल देशमुख

मुनींच्या आश्रमात दिसला. त्यांना वाटले की, कपिल मुनींनीच घोड्याची चोरी केली आहे. त्यामुळे त्यांनी कपिल मुनींना खूप अपशब्द बोलले. त्यामुळे कपिल मुनींना खूप क्रोध आला आणि त्यांनी आपल्या दृष्टीने त्या साठ हजार मुलांना भस्म केले. त्यानंतर, सगर राजाचे वंशज अंशुमान आणि दिलीप यांनीही आपल्या पितरांना तारण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही. नंतर, भगीरथाने आपल्या पितरांना तारण्यासाठी कठोर तपश्चर्या केली. त्याने ब्रह्माजींना प्रसन्न केले आणि गंगेला पृथ्वीवर आणण्याची विनंती केली. ब्रह्माजींनी गंगेला पृथ्वीवर येण्यास सांगितले, पण गंगेचा वेग खूप जास्त होता. त्यामुळे भगीरथाने भगवान शंकराची आराधना केली. शंकरांनी गंगेला आपल्या जटांमध्ये धारण केले. मग, भगीरथाच्या प्रार्थनेवरून शंकरांनी गंगेला पृथ्वीवर पाठवले. गंगा पृथ्वीवर आल्यावर, तिने कपिल मुनींच्या आश्रमाजवळून वाहून जाऊन, सगर राजाच्या साठ हजार पुत्रांच्या राखेला स्पर्श केला आणि त्यांना मोक्ष मिळाला. म्हणूनच, गंगेला भागीरथी देखील म्हणतात. गंगा पृथ्वीवर येण्याची ही कथा साकारली जाणार आहे. या मंडळाचे वैशिष्ठ म्हणजे गणेशोत्सव मध्ये मिरवणुकीचा खर्च टाळून महाप्रसाद भंडारा करण्यात येतो भाविकांसाठी वर्षातून दोनदा रक्तदान शिबिर मंडळ मार्फत घेण्यात येते वर्षातून दोनदा रक्तदान शिबिर मंडळ मार्फत घेण्यात येते. यावर्षाची मंडळाची कार्यकारीणी प्रेरणास्थान- बाबासाहेब (मामा) राजवाडे अध्यक्ष- विशाल शरद देशमुख, उपाध्यक्ष- गणेश शिरसाठ, खजिनदार- अनिल अलई, विजय पगारे, सजावट समिती- साहिल बैरागी, दादू देशमुख.

## 'सावाना नाट्यधारा' उपक्रम: 'पिंडकौल' नाटकातून वास्तववादी दर्शन

**नाशिक ।** नाशिक जिल्हा अहिर सुवर्णकार समाज, हरिओम सांस्कृतिक संस्था, नाशिक प्रस्तुत "पिंडकौल" नाटकाच्या उत्कृष्ठ सादरीकरणातून वास्तववादी दर्शन घडविण्यात आले.

हे दोन अंकी मराठी नाटक मंगळवारी (दि. १२) येथील प.सा. नाट्यगृह नाशिक येथे विशेषतः श्रावण मासाच्या निमित्ताने सादर करण्यात आले. जगाला वैराग्य आणि आत्मज्ञानाची व्याख्या देणारा आपला वारकरी सांप्रदाय आजही जनमानसाचे प्रबोधन करीत आहे. महाराष्ट्रातील गावा-गावात असंख्य मठ, मंडळे विश्व-गुरू संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत नामदेव महाराज अशा अनेक संतांच्या शिकवणी वर विचारांवर आधारित कार्य करीत आहेत. मात्र बदलत्या काळात व्यक्ती तितक्या प्रवृत्ती निर्माण होऊन, संतांच्या शिकवणीला गालबोट लावणाऱ्या प्रवृत्तींचा उगम होत आहे. या वास्तवाचे प्रतिबिंब दाखवणारे वास्तवदर्शी नाटक "पिंडकौल" प्रेक्षकांसमोर सादर झाले.

नाटकातील कथानक मठाधीश परशुराम महाराज यांच्या निवृत्तीनंतर पुढील मठाधीश कोण होणार, यावरून त्यांच्या शिष्यांमध्ये



सुरू झालेल्या सत्तास्पर्धे भोवती फिरते. ही स्पर्धा किती विद्रूप थराला जाऊ शकते, याचा वेध घेणारे हे नाटक केवळ मनोरंजनच नव्हे, तर चिंतनालाही प्रवृत्त करते. रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते नाटक बघुन प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केले. नाटकाचे दिग्दर्शन , पार्श्वसंगीत, नेपथ्य, प्रकाश योजना तंत्रज्ञ बाजु तसेच सर्व कलाकार मंडळींचा अभिनय उत्तम होता. नाटकाचे लेखनः रत्नदीप उतेकर, दिग्दर्शनः- योगेश्वर थोरात, जयप्रकाश पुरोहित, पार्श्वसंगीत :संस्कार जानोरकर, प्रकाश योजनाः विनोद राठोड, रंगभुषा : मानिक नाना कानडे वेशभूषाः-जाई थोरात, नेपथ्य :- जयप्रकाश पुरोहित यांनी केले. योगेश्वर थोरात, निलेश अहिरराव, संदीप पवार, पंकज माळवाल, निशा चव्हाण, कविता होले, अमोल अहिरराव , उल्हास वानखेडे, दीक्षांत मोरे, श्लोक अल्हाट, किर्ती नागरे, योगेश जाधव, राधिका पाटील, सचिता काळे, रेखा देशपांडे, सुनीता शर्मा, निलिमा मोरे, अंजली कानडे,योगेश साळवे, डॉ . जानकी नाईक, संतोष हासेपाटील यांनी भूमिका केल्या.

निर्मिती सहाय्यः प्रकाश थोरात, मनोज जानोरकर, शशिकांत अहिरराव यांनी तर रंगमंच व्यवस्था आकाश बच्छाव, हर्षल मोरे, महेश घोडके, अनिल दुसाने यांनी सांभाळली. यावेळी सावाना नाट्यगृह सचिव गणेश बर्वे यांनी उपस्थित रसिक प्रेक्षकांचे आभारमानले.

# जनादेश चोरी ही मतांची चोरी नाही का?

सोमवार (दि. १२) हा दिवस 'दिल्ली ते मुंबई' च्या राजकारणात देशभर चर्चेचा विषय ठरला. अर्थात, जनकल्याणाच्या एखाद्या चांगल्या गोष्टीसाठी नव्हे तर, संधीसाधू आणि स्वस्वार्थी कारभा-यांनी घातलेल्या 'धुडगुसा'मुळे. दिल्लीत राहुलबाबाच्या नेतृत्वात(?) 'मतचोरी'विरुद्ध निवडणूक आयोगाच्या विरोधात 'इंडिया' आघाडीचा मोर्चा निघाला. तर, राज्यात विविध शहरांत 'मविआ'च्यावतीने सत्ताधारी पक्षांतील कलंकित मंत्र्यांनी राजिनामे द्यावेत, या मागणीसाठी उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वात 'जनआक्रोश' आंदोलन पार पडले. २ दिवसांपूर्वी उध्दव ठाकरे यांचा राहुल गांधी यांनी दिल्लीत केलेला अपमान ( नंतर त्यांच्या नोकराने त्यावर थातूरमातूर स्पष्टीकरण दिले, हा भाग अलहिदा) त्यांच्या चांगलाच जिव्हारी लागल्याने, अजून 'इज्जतीचे खोबरे' होऊ नये, म्हणून त्यांनी मुंबईत 'जनआक्रोश' आंदोलन करण्यात धन्यता मानली असावी. याप्रसंगी त्यांनी आंदोलकांना जे संबोधन केले, त्यावरून त्यांचे हे 'जनआक्रोश' नव्हे तर, 'मनआक्रोश'आंदोलन होते, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. कारण, त्यांनी, नित्यनियमाप्रमाणे आपल्या मनातील फडणवीस आणि भाजपविषयीची मळमळ ओकली. ते म्हणाले की, 'आज महाराष्ट्र जागा झाला आहे'. पण, ते हे विसरले की, जेव्हा त्यांनी स्वतःच्या आणि राजपुत्राच्या स्वार्थासाठी जनादेशाच्या मतांवर 'महादरोडा' टाकला, तेव्हाच महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणूस जागा झाला होता. म्हणूनच त्याने त्यांना विधानसभा निवडणुकीत 'धोबीपछाड' देत कायमचे घरी बसवले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्वत: जनादेशाच्या मतांवर दरोडा टाकणारा स्वार्थी मामु (माजी मुख्यमंत्री) कोणत्या तोंडाने सत्ताधारी पक्षांतील मंत्र्यांचे राजिनामे मागतो? हेच समजत नाही. तो अधिकार आणि तेवढी नैतिकता आपल्यात, आपल्या राजपूत्रात आणि महिलांना अश्लील शिविगाळ करणा-या आपल्या 'थापाड्या' नोकरात आहे का? हे एकदा आरशात बघून, आपण मुख्यमंत्री कसे झालो? याचे आत्मपरीक्षण केले असते तर बरे झाले असते.

स्वतःच्या बापाच्या स्वाभिमान आणि विचारांना तिलांजली देऊन मुख्यमंत्रिपद बळकावले. मुख्यमंत्री हा संपूर्ण मंत्रिमंडळाचा सेनापती असतो. पण, याच सेनापतीने कायदा आणि अधिकारांचा गैरवापर करत, गुन्हेगार आणि निलंबित आपला 'पाळलेला कुत्रा' सचिन वाझे याला पदोन्नतीवर पोलिस सेवेत घेतले. नंतर त्याचा मध्यस्थीने गृहमंत्र्याना दरमहा १०० कोटी खंडणी गोळा करण्याचे फर्मान सोडले. अंबाणींच्या घराबाहेर स्फोटके असलेली कार ठेवली. या प्रकरणात निष्पाप मनसुख हिरेन या व्यापा-याचा बळी घेतला. सचिन वाझेच्या गुन्ह्याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारल्यानंतर, 'वाझे काय लादेन आहे का'? असे निर्लज्जपणाचे समर्थन करताना तुमची नैतिकता कोठे गेली होती? कोरोनासारख्या भीषण संकटात तुमचे बगलबच्चे 'कफन घोटाळा', 'खिचडी घोटाळा' याद्वारे मराठी माणसाच्या 'प्रेतावरच्या टाळूवरचे लोणी' खात होते, तेव्हा डोळे झाकून हा तमाशा का बघत होते? दिशा सालियन प्रकरणात संशयित म्हणून आपल्या राजपूत्राचे नाव आले असता, सीबीआयला महाराष्ट्रात येण्यास बंदी का घातली? परराज्यातील पोलिस तपास करण्यासाठी आले असता, त्यांना निष्कारण क्वारंटाईन का केले? एकनाथ शिंदेंसारखे खरे नेते रस्त्यावर उतरून काम करत होते. पण, आपण गोधडीत घुसून मातोश्रीत लोळत पडला होता. पंतप्रधानांना डरपोक म्हणणारा तुमचा 'अतिशहाणा' नोकर याचे उत्तर देईल का? तुमच्या मंत्रिमंडळातील नवाब मलिक हा मंत्री देशद्रोही दाउदशी असलेल्या लागेबांध्याच्या आरोपातून तुरुंगात गेला. बारामतीच्या काकाने पत्रकार परिषद घेऊन मलिक राजीनामा देणार नाही, असे ठणकावून सांगितले. हा तुम्हालाच एकप्रकारे इशारा होता. मंत्रिमंडळात कोणाला घ्यायचे: आणि कोणाला काढायचे? हा मुख्यमंत्र्याचा अधिकार असतो. त्यावेळेस तुम्ही 'मिठाच्या गुळण्या' का धरून बसलात? हाच का तुमचा मर्दपणा? तुमचा घरगडी मोदी आणि त्यांच्या सरकारला 'पनोती' म्हणतो. मग, तुम्ही मुख्यमंत्री होताच, कोरोनाचे महाभयंकर संकट आले. हा तुमच्या 'पांढ-या' पायाचा पायगुण समजायचा का? गृहमंत्री चक्क खंडणीच्या आरोपात काही दिवस फरार होतो. नंतर त्याला अटक होते. या घटनेने महाराष्ट्राच्या इज्जतीचे धिंडवडे देशाच्या वेशीवर टांगले गेले. तेव्हा मुख्यमंत्री म्हणून तुम्ही नैतिकता दाखवून का नाही दिला राजीनामा?

आताच्या सरकारच्या नावाने 'भ्रष्टाचारा'चे गळे काढता? मग, 'पत्राचाळ', 'कफन', 'मिठी नदी गाळ', 'खिचडी', 'खंडणी वसुली' हे 'भ्रष्टाचार' नव्हे तर, 'शिष्टाचार' होते, असे आपणास म्हणायचे आहे का? गोर-गरिबांची खिचडी खात, त्यांच्या पोटावर तर मारलेच, पण, तेवढ्यानेही पोट भरले नाही म्हणून, 'मिठी' नदीचा 'गाळ'ही खाल्ला? कोठे फेडाल हे पापे? मुख्यमंत्री फडणवीस यांनी कलंकित मंत्र्यांना समज दिली, असा आरोप करताना किमान आपल्याला तेवढा तरी मुख्यमंत्री म्हणून अधिकार होता का? तोंडातून 'ब्र' शब्द जरी काढायचा, तरी काकाची परवानगी घ्यावी लागायची. 'दगडाला शेंदूर फासल्या'गत 'नामधारी मुख्यमंत्री' म्हणून आपणास त्या खुर्चीवर बसविले होते, किमान याचे तरी भान ठेवले असते तर, आपले हसू झाले नसते. कारण, आंदोलनात 'महाविकास आघाडी सरकारचे करायचे काय? खाली डोके वर पाय' अशा घोषणा देत, तुमचे बगलबच्चे तुमचीच खिल्ली उडवत होते. यावर कळस म्हणजे, तुम्हीही म्हणालात की, 'सरकारला डोकेच नाही, तेथे खोके आहे'. म्हणजेच, एकप्रकारे तुम्ही तुम्हाला आणि तुमच्या सरकारला डोके नव्हते, हे किमान आता तरी कबूल केले. तसेच, एका भाषणात तुम्ही स्वतःचा उल्लेख 'मुर्ख मुख्यमंत्री' असा केला होता, यावरही शिक्कामोर्तब करून टाकले.

आंदोलनाच्या आदल्या दिवशी, नेहमीप्रमाणे सकाळी सकाळी 'स्टँडअप' कॉमेडी करताना तुमच्या घरगड्याने 'तुमच्या जखमेवर मिठ चोळत' एक भविष्यवाणी केली. 'फडणवीस हे आयोगाचे लाभार्थी आहेत, चोर आहेत. ५० जागा निवडणूक आयोगाच्या मदतीने चोरल्यामुळे देवेंद्र फडणवीस पंतप्रधान झाले, असे वक्तव्य त्यांनी केले(अर्थात, पुढे फडणवीस पंतप्रधान होतील, हे यांना चांगलेच ठाऊक आहे. कळत नकळत पोटातील गोष्ट ओठांवर आली)

आज 'लोकशाही' नावाची गोष्टच शिल्लक राहिली नाही, असे तुम्ही विरोधक बोंबलता. तुमचे सरकार असताना राणा दाम्पत्यावर 'देशद्रोहा'चा खटला दाखल करून तुरुंगात डांबले. केतकी चितळे हिने एक पोस्ट फॉरवर्ड केली तर तिला अटक करून हीन वागणूक दिली गेली. निखिल भामरे या तरुणाचाही असाच छळ केला. अर्णव गोस्मावी याला घरातून फरफटत आणत तुरुंगात डांबले. केंद्रीय मंत्री असूनही नारायण राणेंना जेवत्या ताटावरून उठवून अटक केली. कंगणा राणावतचे ऑफिस तोडले (नंतर न्यायालयाने आपल्याला फटकारले हा भाग वेगळा). या सर्वांचा तितका गंभीर गुन्हा होता का? अनंत करमुसेला अमानुष मारहाण करणा-या मंत्र्याचा राजीनामा तर दूरच (काकाचा बगलबच्चा होता ना) पण साधी कारवाई तरी करण्याची हिंमत आपण त्यावेळी मुख्यमंत्री या नात्याने दाखविली का? परमवीरसिंगांनी अनिल देशमुखांच्या 'कारनाम्या'चे पत्र पाठवले होते. काकाचा माणूस म्हणून त्या पत्रालाही 'वाटाण्याच्या अक्षदा' दाखविल्यात का ? शर्मा नावाच्या वृध्द नौदल अधिका-याला घरात घुसून तुमच्या बगलबच्च्यांनी गंभीर मारहाण केली. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी मातोश्रीवर बोलावून त्यांचा सत्कार केला. वरतून 'भिऊ नका मी तुमच्या पाठीशी आहे' अशी शाबासकीची थापही दिली. सुशांतसिंग आणि दिशा सालियन प्रकरणातील पुरावे वाझेकरवी नष्ट केले. प्रविण चव्हाण या सरकारी वकिलाला हाताशी धरून, फडणवीस आणि गिरिष महाजनांना खोट्या गुन्ह्यात अडकवून तुरुंगात डांबण्याचे 'षडयंत्र' रचले. तुमचा थापाड्या रोज उठून 'नाकाने कांदे सोलत' लोकशाहीबद्दल गळे काढतो. त्याने सांगावे की, तुमचे सरकार असताना ही कोणत्या प्रकारची 'आदर्श' लोकशाही होती?

'जैसी करणी वैसी भरणी' असा निसर्गनियम आहे. त्यातून कोणीच सुटत नाही. आपले दुर्दैव की, आपणास याची प्रचिती फक्त अडीच वर्षांत आली. सत्ता, पक्ष, चिन्ह, आमदार, खासदार, पदाधिकारी, कार्यकर्ते सगळेच गमविले. 'तेलही गेले, तूपही गेले हाती धुपाटणे आले', अशी आपली अत्यंत दयनीय आणि केविलवाणी अवस्था झाली. स्वतःच्या आणि पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिल्याने एका साध्या पतपेढीच्या निवडणुकीसाठी 'संपलेल्या पक्षाशी' युती करावी लागते, यापेक्षा दुसरे दुर्दैव काय असावे? एकिकडे राजकीय नव्हे तर, संविधान वाचविण्यासाठी आंदोलन असल्याचे सांगायचे; आणि दुसरीकडे आयोग हा भाजपचा हस्तक आहे. आमचा त्यावर अजिबात विश्वास नाही, असे म्हणत, 'दुतोंड्या गांडूळ' अशी अश्लील उपमा देत, घटनात्मक संस्थेचा अनादर करायचा. जेथे भाजपचा पराभव होईल, तेथे ईव्हीएम मशिन चांगले असते. आयोगही हस्तक नसतो. उपराष्ट्रपती जगदीप धनकड कोठे आहेत? असा काळजीयुक्त प्रश्न तुम्ही सरकारला विचारला. परंतु, जेव्हा तृणमुलचा खासदार त्यांचा अगदी वाईट पध्दतीने अपमान करत होता. तुमचे सध्याचे बापजादे त्यांचा व्हिडिओ काढत होते. तेव्हा तुमचे आणि तुमच्या नोकराचे 'मगरीचे अश्रू' आणि 'पुतणा मावशी'चे प्रेम कोठे गेले होते? जनादेशाच्या मतांवर दिवसाढवळ्या महादरोडा टाकल्या नंतर, मतदारांनी जी चपराक मारली, त्यातून विरोधक आजही सावरूच शकत नाहीत. विधानसभा तर गेलीच. पण, आता मुंबईसह इतर महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही जिंकणे अवघड झाले आहे. आज 'नाचता येईना, अंगण वाकडे' अशी काही अवघड अवस्था झाल्यामुळेच, यांना आयोगाकडून कोणतेही उत्तर नकोय. फक्त निरर्थक कांगावा करत, जनतेत संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि सहानुभूती मिळवण्यासाठी केलेली ही एक 'हास्यास्पद नौटंकी' आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आजच्या कलंकित मंत्र्यांचे राजिनामे मागण्याइतके तुम्ही काही 'धुतल्या तांदळासारखे स्वच्छ' अजिबातच नाही. उद्या तुमचे सरकार आले (तशी शक्यता कमीच आहे) तर अशीच नौटंकी बघायला मिळेल. कारण राजकारणात 'सब घोडे बारा टक्के' असे उगाचच म्हणत नाहीत. कारण, भ्रष्टाचार, खंडण्या, घोटाळे हे बहुतेक नेत्यांच्या 'पाचवीलाच पूजलेले' आहे, असो.

बिहारमध्ये बनावट मतदार याद्यांद्वारे निवडणूक आयोगावर केलेला 'मतचोरी'चा आरोप जेव्हा सिद्ध व्हायचा तेव्हा होईल. पण, 'चोराच्या उलट्या बोंबा' मारणा-या 'दरोडेखोरां'नी जनादेशावर दिवसाढवळ्या 'महादरोडा' टाकून 'मतचोरी' केली, हे मात्र 'सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ' स्पष्ट झाले आहे, हे मात्र नक्की.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
**नाशिक**
**मोबाईल क्र. ८७६७५९२९८०**

# इंग्रजांच्या भूमित इंग्रज अधिकारी कर्झन वायलीची हत्या करणारे महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा

मदनलाल धिंग्रा यांचा जन्म १८ सप्टेंबर १८८३ ला अमृतसर येथे उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील एक ख्यातनाम डॉक्टर होते आणि बंधू बॅरिस्टर होते. मदनलालांचे शिक्षण अमृतसरला झाले. ते पंजाब विद्यापीठातून बी. ए. झाले व १९०६ मध्ये उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तत्पूर्वी विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह झाला. इंग्लंडमध्ये त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचा अभ्यास केला. तेथील वास्तव्यात त्यांचा स्वातंत्र्यवीर सावरकर, श्यामजी कृष्णवर्मा, हरदयाळ शर्मा वगैरे क्रांतिकारकांशी स्नेह जमला व तेथूनच त्यांच्या हृदयात क्रांतीची मशाल धकधकायला लागली. इंग्लंडमध्ये शिकत असताना त्यांनी सर विलियम कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या केली. या घटनेचा २० व्या शतकातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील पहिल्या क्रांतीकारी घटनांपैकी एक म्हणून उल्लेख केला जातो. मदनलाल धिंग्रा होमरूल लीग व सावरकरांच्या अभिनव भारत या संस्थांचे सभासद झाले. त्यांच्या भावनाप्रधान मनावर खुदिराम बोस व कन्हैयालाल या क्रांतीवीरांच्या बलिदानाचा फार मोठा परिणाम झाला होता. त्यांनी सशस्त्र क्रांतिवीरास साजेसे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी भारताच्या मंत्र्याचा स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली याच्या खुनाचा कट रचला. त्यांचा पहिला बेत फसला. पुढे १ जुलै १९०९ रोजी इंपीरियल इन्स्टिट्यूटच्या जहांगीर हाऊसमध्ये इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी त्यांनी कर्झन वायली यावर गोळ्या झाडल्या व त्यांची हत्या केली. कारण बंगालची फाळणी करण्यात कर्झन वायलीचा हात होता व भारतात ब्रिटिश सरकार व्दारे भारतीयांची अमानवी हत्या त्यांना पहावली नाही व अमानवी हत्यांचा बदला घेण्याच्या



उद्देशाने इंग्लंडमध्ये म्हणजे त्यांच्या घरात घुसून कर्झन वायलीची हत्या केली व एक देशभक्त पूर्ण कृत्याच्या स्वरूपात विल्यस कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याला यमलोक पोहचविले व विदेशात जाऊन ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करणारा २० व्या शतकातील पहिला स्वतंत्र चळवळीतील क्रांतिकारक म्हणून मदनलाल धिंग्रा यांचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतले जाते. या खुनाबद्दल मदनलाल धिंग्रा यांना अवघ्या महिन्याभरात फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली व १७ ऑगस्ट १९०९ ला इंग्लंडच्या पेन्टोनव्हिल तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली व क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा भारत माता की जयच्या उद्घोषात हसत हसत फासावर गेले. अशा महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा यांना कोटी कोटी प्रणाम. फाशीवर जाण्यापूर्वीच्या शेवटच्या वक्तव्यात मदनलाल धिंग्रा म्हणले आहे आत्म बलिदान कसे करावे ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानात देण्यायोग्य आहे. ही शिकवण देण्याचा एकच मार्ग म्हणजे स्वतःचे बलिदान करून मोकळे होणे होय. १७ ऑगस्ट १९०९ हा दिवस कुणीही सच्चा देशभक्त कधीही विसरणार नाही. कारण याच दिवशी सर विल्यम हट कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याचा वध करणारे हुतात्मा मदनलाल दित्तमल धिंग्रा हसत हसत फासावर चढले. आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी थोर क्रांतीकारकारकांच्या पावलावर पाऊल ठेवून देशहित कार्य करण्याची गरज आहे. देशात वाढता भ्रष्टाचार यावर अंकुश अती आवश्यक आहे. कारण आज वाढता भ्रष्टाचार व राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल करोडोंची संपत्ती यामुळे देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. क्रांतिकारकांनी देश स्वतंत्र करण्यासाठी आपले बलिदान दिले. परंतू आज आपण स्वतंत्र भारतात वावरतो आहे. त्यामुळे क्रांतिकारकांच्या बलिदानाला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेऊन देशहिताचे कार्य केले पाहिजे व देशाला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजांनी देशाला लुटले त्यापेक्षा हजार पटीने आजचा भ्रष्ट राजकीय पुढारी देशाला पोखरत आहे व देशाला खिळ-खिळा करीत आहे यावर सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे क्रांतिकारकांची जोत नेहमी प्रज्वलित रहावी व आपल्या हृदयात त्यांच्या आठवणी निरंतर जीवीत राहाव्यात यासाठी आजच्या दिवशी सरकार, प्रशासकीय विभाग, स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था व शाळा -महाविद्यालय यांनी वृक्षलागवडीला प्राधान्य दिले पाहिजे. कारण या दिवशी लावलेल्या प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला संपूर्ण क्रांतिकारकांचे अवश्य दर्शन होईल. शहीद मदनलाल धिंग्रा ह्यांना कोटी-कोटी प्रणाम, जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.**
**मो.नं. ९९२१६९०७७९**

# गोपाळकाला




गोपाळकाला म्हटले की, उंचच्या उंच हंड्या आणि त्या फोडण्यासाठी जिवाचे रान करणारे तरुण डोळ्यांसमोर येतात; मात्र गोपाळकाला या सणाला आध्यात्मिक आणि पौराणिक पार्श्वभूमी असून ते शास्त्र लक्षात घेऊन साजरा केल्याने जिवाला त्याची अनुभूती घेता येते. गोपाळकाल्याचे अध्यात्मिक महत्त्व आणि त्याचे लाभ यांविषयीची माहिती या लेखातून जाणून घेऊया.

१. गोपाळकालाचा अर्थ

अ. श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोर्‍या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली.

आ. गोपाळकाला म्हणजे पांढऱ्या रंगाच्या पाच रसात्मक स्वादांचा अधिकाधिक प्रमाणात निर्गुण चैतन्याशी संबंध दर्शवणारा आणि पूर्णावतारी कृष्णकार्याचे दर्शक असलेला समूच्चय. काला हा शब्द एकसंध आणि वेगात सातत्य असणाऱ्या क्रियेशी संबंधित आहे. काला म्हणजे त्या काळाला, त्या स्थळाला, त्या त्या स्तरावर आवश्यक असे वैशिष्टपूर्ण कार्य दर्शवणाऱ्या घटनांचे एकत्रिकरण.

पूर्णावतारी कार्य हे स्थळ, काळ आणि स्तर या तीनही घटकांवर आदर्शवत असेच असते. या कार्यप्रक्रियेत विविधांगी जीवनाचे पैलू आध्यात्मिकरीत्या ईश्वरी नियोजनाद्वारे मानवजातीसमोर लीलया उलगडून दाखवले जातात. गोपाळकाला हा श्रीकृष्णाच्या विविधांगी पूर्णावतारी कार्याचे प्रतिनिधित्व करतो.

२. काल्यातील प्रमुख घटक

पोहे, दही, दूध, ताक आणि लोणी हे काल्यातील प्रमुख घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहेत.

अ. पोहे : वस्तूनिष्ठ गोपभक्तीचे प्रतीक (काहीही झाले, तरी श्रीकृष्णाला धरून ठेवणारे सवंगडी)

आ. दही : वात्सल्यभावातून प्रसंगी शिक्षा करणाऱ्या मातृभक्तीचे प्रतीक

इ. दूध : गोपींच्या सहज सगुण मधुरा भक्तीचे प्रतीक

ई. ताक : गोपींच्या विरोध भक्तीचे प्रतीक

उ. लोणी : सर्वांच्या श्रीकृष्णावरील अवीट प्रेमाच्या निर्गुण भक्तीचे प्रतीक

या दिवशी ब्रह्मांडात कृष्णतत्त्वाच्या आपतत्त्वात्मक प्रवाही गतिमान लहरींचे आगमन होते. काल्यातील पदार्थ या लहरी ग्रहण करण्यात अग्रेसर असतात.

३. गोपाळकाला, गोपाळकाल्याची दिव्य चव आणि दहीहंडी फोडणे यांचा भावार्थ

अ. गोपाळकाला

दृश्य स्वरूपात गोपाळकाला म्हणजे कीर्तनानंतर किंवा गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी फोडून ग्रहण करतो, तो प्रसाद.

आ. गोपाळकाल्याची दिव्य चव

वरील सर्व पदार्थ एकत्र आणि एकजीव करून ग्रहण केल्यावर त्याची चव अवर्णनीय असते. त्याची चव अतिशय दिव्य असते.

इ. दहीहंडी फोडणे

दहीहंडी हे जिवाचे प्रतीक आहे. दहीहंडी फोडणे, हे जिवाने देहबुद्धी सोडून आत्मबुद्धीत स्थिर होणे, या अर्थाने आहे आणि दिव्य चव हे आनंदाचे प्रतीक आहे.

**: संदर्भ :**
**सनातन-निर्मित ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते**
**संकलन : सौ. अंजली पाध्ये**
**सनातन संस्था, नागपूर**
**संपर्क ९९७५५३६९०६**

# राष्ट्रीय सणानंतरही राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा

७९ वा स्वातंत्र्यदिवस संपूर्ण भारतामध्ये अतिशय आनंदाने व प्रसन्नतेचे साजरा करण्यात आला. देशभक्तीपर, गौरवशाली गाण्यांनीगल्ली पासून ते दिल्ली पर्यंत वातावरण दुमदुमले. शाळकरी मुले, महाविद्यालयीन तरुण तरुणी, शासकीय कर्मचारी व इतर नागरिक सकाळी लवकर उठून ध्वजारोहणासाठी तयारी करून हजर झाले. रस्त्या- रस्त्यावर आपल्या देशाच्या राष्ट्र ध्वजाचे प्रतीक असलेले खिशाला लावण्यासाठी बिल्ले, तीन रंगांचे फुगे त्याचबरोबर नायलॉन, प्लास्टिक व कागदी झेंडे यांचे दुकाने थाटलेले दिसत होते. हर घर तिरंगा या अभियांना अंतर्गत संपूर्ण भारतात घरोघरी झेंडे लावले. भ्रमन ध्वनीमध्ये सेल्फी कैद केल्या. शाळकरी मुले, कर्मचारी राष्ट्रध्वजाचे प्रतीक असलेले बिल्ले खिशाला लावून अभिमानाने मिरवत होते. काही दुचाकी व इतर वाहनांवर झेंडे लावलेले दिसून येत होते. त्याचप्रमाणे काही दुकानांना तिरंगी फुगे लावून सजवलेले दिसून येत होते. देशप्रेमाने प्रेरित होऊन समस्त भारतीय नागरिक ज्याच्या त्याच्या परीने देशाला व सैनिकांना मानवंदना देत होते काही चित्रकार, वाळू कलाकार, निसर्गप्रेमी त्यांच्या कलेतून राष्ट्रध्वजाला सलामी देऊन आपापली कला सादर करत होते. ऑपरेशन सिंदूर चे प्रतिकात्मक पोस्टरर्स लावून शूर सैनिकांना मानवंदना देत होते. अर्थात प्रत्येक भारतीय नागरिक देशाच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त देशाप्रती आदर, प्रेम व्यक्त करत होता. हे मनमोहक दृश्य बघून मन दिवसभर अगदी प्रसन्न झाले.

देशाची राजधानी दिल्ली येथे भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान सहित तिन्ही दलाचे प्रमुख उपस्थित होते. त्याच प्रमाणे ऑपरेशन सिंदूर यशस्वी करणारे सर्व सैनिक मोठ्या उत्साहाने आपला राष्ट्रीय सण साजरा करण्यासाठी उपस्थित होते. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतातील कलाकार आपल्या कलेच्या माध्यमातून भारतीय ध्वजाला सलामी देत होते. स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून खरोखरच हा नयनरम्य सोहळा बघून अतिशय अभिमानास्पद असे चित्र दिसून येते. सध्याच्या काळात समाज प्रसाराच्या माध्यमातून नागरिक एकमेकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत होते. टीव्ही चॅनलवर स्वातंत्र्यदिनानिमित्त दिवसभर वेगवेगळ्या स्वरूपाचे देशभक्तीचे प्रदर्शन चालू होते. दरवर्षी सायंकाळी नेहमीप्रमाणे शाळा, महाविद्यालय शासकीय निमशासकीय कार्यालये व सहकारी संस्था आपल्या राष्ट्रध्वजाला सन्माणाने खाली उतरवतात व सन्मानाने जतन करून ठेवतात. स्वातंत्र्य दिनानिमित्ताने संपूर्ण भारतभर देशाच्या तिरंगा ध्वजाचा सन्मान राखला गेला. हल्ली भारतीय ध्वजाचे प्रतिक म्हणून तिरंगा अश्या वास्तू साहित्य जसे की, प्लॅस्टिक, कागदी ध्वज, पितळी बिल्ले, तीन रंगांचे फुगे वापरून आपला राष्ट्रीय सण अगदी उत्साहात सर्वजण साजरा केल्या जात आहे. ही अतिशय आनंदाची बाब आहे मात्र, आपल्या दुचाकी, चारचाकी अथवा इतर वाहनां वर जे प्लास्टिकचे ध्वज लावलेल्या असतात त्याचा अवमान होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. काही तांत्रिक कारणामुळे राष्ट्रध्वज तुटतो, मुलांच्या हातातून उडून पडतो, खिशाचा राष्ट्रध्वजाचा बिल्ला खाली पडतो त्याचप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी दुचाकी, चारचाकी उभी केली असता भटकी जनावरांकडून किंवा हवेमुळे खाली पडतो. ते तसेच जमिनीवर पडून राहतात. हवेबरोबर इतरत्र उडून कचऱ्याच्या ठिकाणी पडतात. झाडांच्या फांद्यामध्ये अडकतात. तुटतात, फाटतात. कालांतराने आपला प्राणप्रिय राष्ट्रध्वज पायदळी येऊन त्याचा अवमान होण्याची शक्यता असते म्हणून शाळकरी मुले, महाविद्यालयीन तरुण तरुणी, कर्मचारी व इतर नागरिक यांनी वैयक्तिक व सार्वजनिक ठिकाणी आपला राष्ट्रीय ध्वज व इतर भारतीय ध्वजांची प्रतिके असलेले साहित्य सन्मानाने, जीर्ण व खराब होण्याअगोदर उतरून किंवा काढून ठेवावी. जेणेकरून जमिनीवर पडून, पायदळी येऊन त्यांचा अवमान होणार नाही, याची काळजी घ्यायला घ्यावी.

अशा प्रकारे फक्त स्वातंत्र्यदिनीच नाहीतर, प्रत्येक दिवशी कायम राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा. जय हिंद!

**विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**
**मो नं ९७६३२८२०७७**

# 'अशा' चित्रपटाना होणारा विरोध रास्तच !

**वाचक लिहितात**

भारतीय समजमानावर चित्रपटांचा मोठा प्रभाव जाणवतो. चित्रपटातील कथानक, संवाद लोकांच्या मनावर घर करून राहतात. चित्रपटातील कलाकारांना लोक आदर्श मानतात त्यामुळे चित्रपट निर्मिती करताना लोकांच्या मनावर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी निर्माता दिग्दर्शकांनी घ्यायला हवी. पूर्वीच्या मराठी चित्रपटातून ती घेतली जात असे. गेल्या काही वर्षात मात्र चित्रपटनिर्मिती हा केवळ पैसा कमावण्याचे साधन झाले आहे. त्यामुळे लोकांना काय दाखवणे आवश्यक आहे यापेक्षा लोकांना काय बघायला आवडेल याचा विचार अधिक केला जातो मग ते नैतिकतेला किंवा सत्याला धरून असो वा नसो. नुकताच प्रदर्शित झालेला 'खालिद का शिवाजी' या मराठी चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा आहे. या चित्रपटात छत्रपती शिवरायांच्या सैन्यात पस्तीस टक्के मुसलमान होते आणि त्यांचे अकरा अंगरक्षक हे मुसलमान होते तसेच शिवरायांनी रायगडावर मशीद बांधली होती असे दाखवण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहासच जर दाखवायचा होता तर छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी घेतलेले परिश्रम, त्यांनी केलेले गनिमी कावे, मावळे आणि राजे यांच्यामधील अतूट नाते, त्यांची अस्मिता टिकवून ठेवणारे त्यांनी बांधलेले गडदुर्ग या पार्श्वभूमीवर चित्रपटातील दृश्य का चित्रित केली गेली नाहीत. या चित्रपटात एका वर्गाचे तुष्टीकरण केलेले दिसून येते आणि त्यासाठी असत्याचा आधार घेण्यात आलेला आहे. छत्रपती शिवरायांचा हिंदवी स्वराज्याचा इतिहास जरी भूतकाळ असला तरी वर्तमानात प्रत्येक शिवप्रेमींच्या मनात तो जागृत आहे. छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या लोककल्याणकारी हिंदवी स्वराज्याची महती आज साऱ्या जगाला ज्ञात आहे. आजच्या तरुणाईचे होत असलेले नैतिक अध:पतन, समाजाची दिवसागणिक होत असलेली अवनती, माजलेला भ्रष्टाचार आणि अनाचार पाहता देशात पुन्हा एकदा हिंदवी स्वराज्य स्थापन व्हावे अशी प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाची इच्छा आहे. 'खालिद का शिवाजी' सारखे चित्रपट मात्र समाजाला चुकीच्या प्रवाहाकडे नेण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे या चित्रपटाला होत असलेला विरोध रास्त आहे.

**लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

# माणसा का करतो, नात्यातील पावित्र्य कलंकित

हल्ली माणूस नातीगोती पार विसरून गेला आहे. कोणत्या नात्यासोबत कसा व्यवहार करायचा असतो? याचे जराही भान त्याला राहिले नाही. तो कोणत्याही नात्यासोबत ठराविक व नियमबद्ध व्यवहार न करता रानटी पशुप्रमाणे व्यवहार करू लागला आहे. त्याला स्वतःच्या स्वार्थापायी व लैंगिक वासनेपायी नातीगोती काहीच कळत नाही. तो कोणत्याही नात्यासोबत कसाही व्यवहार करून नात्यातील पावित्र्य कलंकित करत आहे. शाळेतील शिक्षकाचे विद्यार्थिनी सोबत लैंगिक संबंध किंवा शाळेतील शिक्षकानेच केले विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार, चुलत भावानेच केला चुलत बहिणीवर बलात्कार, चुलती व पुतण्याचे लफडे आले उजेडात किंवा पुतण्याने केले चुलतीवर लैंगिक अत्याचार, सख्ख्या बापानेच केला पोटच्या मुलीवर बलात्कार, अशा विषयाच्या कितीतरी बातम्या आपण रोज वर्तमानपत्रांत वाचत आहोत. टीव्हीवर किंवा सोशल मीडियावर रोज पाहत आहोत. अशा बातम्या वाचून सभ्य व सुसंस्कारी माणसाचे मन सुन्न होते. जन्म देणारा बापच जर पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करत असेल तर माणूस कोणत्या थराला गेलाय आणि माणूस इतका निष्ठुर व कठोर हृदयाचा कसा काय झालाय? हे कळायला मार्ग नाही. पोटच्या मुलीवर बलात्कार करताना त्या निर्दयी बापाला लाज कशी वाटली नसेल? त्याच्यातली मानवता कुठे चरायला गेली असेल? माणूस एवढा हैवानासारखा का वागत असेल? याचा प्रत्येकाने विचार करून बघावा, असे मला वाटते. माणूस लैंगिक वासनेपुढे कोणताच मागचा पुढचा विचार करत नाही. त्याच्यातली वासना उफाळून आली की, त्याच्यातला दुष्ट राक्षस जागा होतो आणि त्याला ना सखी बहीण कळते, ना चुलती कळते, ना स्वतःची मुलगी कळते, ना स्वतःची विद्यार्थिनी कळते, ना जन्मदाती आई कळते, तो वासनांध होऊन वासनेच्या नशेत यांच्यावर निर्दयी व निष्ठूरपणे बलात्कार व अत्याचार करून मोकळा होतो. म्हणून आजकाल नात्यातील पावित्र्य कलंकित होत आहे. माणुसकी सुद्धा ओशाळत आहे आणि माणसाला सांगत आहे की, माणसा नको करू रे नात्यातील पावित्र्य कलंकित. शेतीची वाटणी करताना किंवा घराची वाटणी करताना गुंठाभर जमिनीसाठी व इंचभर जागेसाठी सख्खे भाऊ पक्के वैरी बनून एकमेकांना भांडताना व हाणामारी करून घेताना दिसतात. स्वार्थापायी कोणत्याही थराला जाऊन कोणतेही टोकाचे पाऊल उचलतात आणि सख्ख्या भावाचाच काटा काढतात. पेरणीच्या तोंडावर शेतीच्या वादाचे अनेक खटले पोलीस स्टेशनमध्ये व कोर्टामध्ये रोज दाखल होत असतात. आई वडील जमीन नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना जिवानिशी मारणारे आणि आई वडिलांना घराबाहेर काढणारे महाभाग काही कमी नाहीत. अनेक बुवा महाराज व भोंदू बाबा भगवे वस्त्र परिधान करून एखाद्या मठात किंवा मंदिरात बसतात आणि अनेक महिला त्या भोंदू बाबाच्या शिष्य बनून त्याच्याकडे येतात, तेव्हा ते भोंदू बाबा त्या महिलांना सांप्रदायिक शिकवण न देता, त्यांची दिशाभूल करून व त्यांना फसवून त्यांचे लैंगिक शोषण करतात आणि गुरु शिष्याच्या पवित्र नात्याला कलंकित करतात. सांगायचे तात्पर्य एवढेच की, एकेकाळी नात्यांमध्ये असणारे नितळ प्रेम, निखळ माया व निकोप प्रेम आता लयाला जाऊन माणूस राक्षस बनला आहे आणि राक्षसी कृत्य करून जोडलेल्या व रक्ताच्या नात्यातील पावित्र्याला कलंकित करत आहे. कारण एकेकाळी माणूस सुसंस्कारी, दयाळू, मायाळू आणि मानवता जपणारा सभ्य माणूस होता. तेव्हा घरोघरी टीव्ही नव्हत्या. प्रत्येकाकडे महागडे मोबाईल नव्हते. त्याकाळी संस्काराची रुजवन करणारे आजी आजोबा प्रत्येक घरी असायचे. घरातील आई वडील व आजी आजोबा आपल्या मुलांवर चांगले संस्कार रुजवायचे. तेव्हाची शालेय शिक्षण प्रणाली सुद्धा सुसंस्कारी व दर्जेदार होती. शिक्षक सुद्धा विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच संस्काराची शिदोरी सुद्धा द्यायचे. म्हणून तेव्हाचे विद्यार्थी चांगले घडायचे आणि आपले नाव कमवायचे. म्हणून विद्यार्थ्यांवर कोणत्याच गोष्टीचा वाईट परिणाम होत नव्हता. त्यांच्यातील वासना आताच्या एवढी उफाळून येत नव्हती. स्वार्थ आजच्या एवढा बोकाळला नव्हता. म्हणून तेव्हा नात्यातील ऋणानुबंध कायम टिकून होता. नात्यातील पावित्र्य बावनकशी सोन्यासारखे चमकायचे. आता घरोघरी प्रत्येकाकडे मोबाईल आला आहे. प्रत्येक घरात मोठा टीव्ही आहे. टीव्हीवर नको ते घाण घाण सीन दाखवतात. प्रत्येक चित्रपटात अश्लीलता ठासून भरलेली असते. मोबाईल मध्ये सुद्धा तेच पाहायला मिळते. फेसबुक, युट्युब व गुगलवर विद्यार्थी घर बसल्या नको ते सर्च करून पाहत असतात. मोबाईलचा चांगला वापर करण्यापेक्षा वाईट व सेक्सी फिल्म बघण्यासाठी मुले मोबाईलचा वापर करत असतात. यातूनच मुलांमध्ये लैंगिक वासना वाढीस लागते आणि वासनेपुढे ते बेभान होतात, त्यांना नातीगोती, बहिण, चुलती, ना आई, हे काहीच कळत नाही. ते वासनांध होऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करून नात्यातील पावित्र्य डागाळतात आणि मानवतेला अशोभनीय वर्तन करून माणुसकी सुद्धा कलंकित करतात. ही आपल्या देशासाठी फार मोठी धोक्याची घंटा आहे. कारण याचा परिणाम थेट आपल्या देशाच्या विकासावर होतो. वाचक मित्रांनो जास्त काही न लिहिता मला एवढेच सांगायचे आहे की, बांधवांनो आपल्यात असलेला निष्ठुर व निर्दयी हैवान बाजूला काढून समतेचा व मानवतेचा पुरस्कार करणारे महामानव आपल्या अंगात आणावेत आणि नात्याची गुंफण अधिक घट्ट करावी. नात्यात माया, ममता, प्रेम व आपुलकी वाढवावी. आणि प्रत्येक नात्यासोबत नियमबद्ध व चांगला व्यवहार करून नात्यातील पावित्र्य आणखीन पवित्र करावे. स्वतःमध्ये असलेला स्वार्थ, गर्व, अभिमान, माज आणि वासना यांचा त्याग करून प्रत्येकासोबत चांगला ऋणानुबंध ठेवा. एकमेकांच्या मदतीला धावून जा, एकमेकांच्या अडीअडचणी सोडवा, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जा, एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवा, वृद्ध आई-वडीलांना अंतर देऊ नका...मग बघा खरंच होईल का? नात्यातील पावित्र्य कलंकीत....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो. क्र. ७४९८७१५६६१**

पनवेल महानगरपालिका
स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

अभय योजना

**केवळ एक वेळची विशेष व अंतिम बाब, करदात्यांसाठी सुवर्णसंधी !!!**

# अभय योजने अंतर्गत शास्ती माफीला मुदतवाढ

## मालमत्ता कर एकरकमी भरा व शास्तीवर सवलत मिळवा !

**१६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ९०% सवलत.**

**१६ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ७५% सवलत.**

कर MITRA तुमच्या सर्व प्रश्नांचे समाधान एकाच ठिकाणी!

पनवेल महानगरपालिकच्या panvelmc.org या संकेतस्थळावर जाऊन नागरीक आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करू शकतात. मालमत्ता कराचा भरणा, तक्रारी, अभिप्राय व सुचना "पीएमसी कर मित्र" या चॅटबॉट च्या माध्यमातून नोंदविता येतील. नागरिकांनी आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता रांगेत उभे न राहता ऑनलाईन स्वरूपात "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.

**चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा, ५% सूट हमखास मिळवा.**

**E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा, २% सूट घेऊन बचत वाढवा!**

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने, आणि करामध्ये घ्या २% सूट!

जल पुनःभरणाचा अवलंब करा, २% सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळा, सवलतीचं दार उघडा आणि करात २% सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट करा, मिळवा २% करामध्ये सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय पारंपरिक रांगा सोडा, PMC Tax App & Panvel Connect App वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता करामध्ये सवलती मिळावा.

**मंगेश चितळे**
आयुक्त तथा प्रशासक,
**पनवेल महानगरपालिका**
स्वामी नित्यानंद रोड, गोखले हॉल जवळ पनवेल - 410206